# नक्षलग्रस्त आदिवासी क्षेत्रात अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

भाग

३४

आदिवासी क्षेत्रात चांगले, होतकरु व कार्यक्षम अधिकारी नेमणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९०/प्र.क्र. ११/९०/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जानेवारी १९९१.

पहा:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सकाकाक्रीवप-टिएसई-१०८३/प्र.क्र.६५१/का.१४[१], दिनांक ४ एप्रिल १९८३.

## प रि प त्र क

आदिवासी भागातील कार्यालयामध्ये उत्साही, तरुण व कार्यक्षम अशा कर्मचा-यांची नेमणूक करण्यात यावी. कर्मचा-यांना शिक्षा देण्यासाठी या भागात नेमले जाऊ नये. तसेच निरुत्साही, अनुत्सुक किंवा सेवानिवृत्ती जवळ आलेले कर्मचारी या भागात नेमल्यास त्याचा आदिवासी क्षेत्रातील कामावर वाईट परिणाम होतो व शासनाचे ध्येय पूर्ण होणे अवघड जाते, म्हणून या सर्व गोष्टींचा काळजीपूर्वक विचार करुन आदिवासी भागात चांगला कर्मचारी वर्ग नेमला जाईल याबाबत कृपया दक्षता घ्यावी, असे उपरोक्त दिनांक ४ एप्रिल १९८३ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आले होते. तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, आदिवासी भागात अधिका-यांच्या नियुक्त्या करताना त्या तेथील गरजेनुसार केल्या जात नाहीत. या उलट अनेकदा ज्या अधिका-यांच्या दुसरीकडे नियुक्त्या करता येत नाहीत अशांची अल्प कालावधीकरिता शिक्षा म्हणून आदिवासी भागात नियुक्ती केली जाते. याचा आदिवासी भागातील प्रशासनावर विपरित परिणाम होतो.

२. आदिवासी भागातील सध्याचे बिकट प्रश्न लक्षात घेता आदिवासी व डोंगराळ भागात नियुक्त करण्यात येणारे अधिकारी हे धडाडीचे व चांगल्या दर्जाचे असले पाहिजेत, अशी शासनाची इच्छा आहे. शासनाची अशीही इच्छा आहे की, जे अधिकारी चांगले काम करु शकतील असे अधिकारी आदिवासी भागात नियुक्त करावेत व कोणत्याही परिस्थितीत आदिवासी भागातील नियुक्ती ही शिक्षा म्हणून असू नये. आदिवासी भागातील सेवा ही त्या व्यक्तीच्या प्रशासकीय कारकीर्दीतील दुर्गम प्रदेशाचे व कठीण परिस्थितीचे प्रशासन करण्याची क्षमता व गुणवत्ता याची मान्यताच समजली जावी अशी भावना प्रत्येक विभागात दृढ होईल याकडे संबंधित नियुक्ती अधिका-यांनी लक्ष पुरवावे.

३. शासनाचे असेही आदेश आहेत की, सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी वरील मार्गदर्शक तत्वे लक्षात ठेवून त्यांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी होत आहे याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचा आढावा घेऊन त्यासंबंधीचा अहवाल दरवर्षी जुलै महिन्यात आदिवासी विकास विभागाकडे पाठवावा.

४. बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-यांनी शासकीय सेवकांची बदली

करण्यापूर्वी त्यांना वैयक्तिक पसंतीची तीन चार ठिकाणे कळविण्याची संधी द्यावी व नियतकालिक बदल्यासंबंधी निर्णय घेताना शासकीय सेवकांनी कळविलेली पसंती व प्रशासकीय सोय या दोन्ही बाबी विचारात घेऊन बदल्यासंबंधी निर्णय द्यावेत, अशा स्वरूपाचे आदेश शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०८५/सीआर-३०/१२, दिनांक १६ जुलै १९८५ अन्वये काढण्यात आलेले आहेत. अशा परिस्थितीत शासकीय सेवकाने आदिवासी क्षेत्रात किमान ५ वर्षे चांगली सेवा केल्यानंतर त्याच्या पसंतीच्या ठिकाणी बदली मागितली तर त्या सेवकास अग्रहक्काने पसंतीच्या ठिकाणी नेमणूक देण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी जरूर विचार करावा. मात्र नंतरच्या बदलीच्या प्रसंगी त्या शासकीय सेवकाच्या पसंतीप्रमाणे पुन: बदली द्यावी, असे कायम सूत्र अवलंबिण्यात येऊ नये.

५. जे अधिकारी उपरोक्त आदेशांची योग्य व आवश्यक ती अंमलबजावणी करणार नाहीत, त्या अधिकाऱ्यांविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एच. ए. डी. साविचन,
प्रधान सचिव [सेवा],
सामान्य प्रशासन विभाग.

गोपनीय

चंद्रपूर व गडचिरोली किंवा इतर जिल्ह्याच्या विकासाकरिता विशेष कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी.

---

कार्यक्षम अधिकारी नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०९२/सीएम-१०/प्र. क्र. २/९२/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ जुलै, १९९४.

पहा :- १] शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०९०/प्र.क्र. ११/९०/बारा, दिनांक ७ जानेवारी, १९९१.

२] शासन परिपत्रक, क्रमांक-एसआरव्ही-१०९२/सीएम-१०/प्र.क्र. २/९२, दिनांक, ११ फेब्रुवारी, १९९२.

## शुध्दीपत्रक

आदिवासी भागातील कार्यालयात उत्साही, तरुण व कार्यक्षम अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात यावी तसेच जे शासकीय सेवक आदिवासी क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षे चांगली सेवा पूर्ण करतील, त्यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करताना त्यांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

"शासकीय सेवकाने आदिवासी क्षेत्रात किमान ५ वर्षे चांगली सेवा केल्यानंतर त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली मागितली तर त्या सेवकास अग्रहक्काने पसंतीच्या ठिकाणी नेमणूक देण्याबाबत सक्षम प्राधिका-यांनी प्रशासकीय सोयी लक्षात घेऊन अशा सेवकाच्या त्यांच्या पसंतीक्रमानुसार बदल्या करण्याबाबत शक्यतो विचार करावा."

२. तसेच शासन परिपत्रक, दिनांक ११ फेब्रुवारी, १९९२ मधील परिच्छेद-२ मध्ये शेवटच्या वाक्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

"ज्या जिल्ह्यामध्ये विशेष कृती कार्यक्रम राबविला जातो त्या जिल्ह्यांतर्गत निरनिराळ्या सेवेतील पदावर नियुक्ती करताना ४५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वयोगटातील कार्यक्षम अधिकारी शक्यतो

क्रमशः...

नियुक्त करण्यात यावेत. मात्र विशेष कृषि कार्यक्रमाशी संलग्न नसलेल्या अन्य सेवेमध्ये किंवा पदावर प्रशासकीय कारणास्तव नियतकालिक बदल्या करताना हे निर्बंध लागू करु नयेत."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ य. मो. जोशी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**आदिवासी क्षेत्रात चांगल्याप्रकारे काम केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना पसंतीच्या ठिकाणी बदली देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-टीआरएफ-२०००/एम/८/प्र.क्र.३/बारा,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
दिनांक-११ जुलै,२०००

**संदर्भ :-** १) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग,क्रमांक-टिएसपी-१०८६/ ८७१०/प्र.क्र.३१/ का-५,दिनांक ९ मार्च,१९९०,

२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०९०/ प्र.क्र.११/९०/ बारा, दिनांक ७ जानेवारी, १९९१,

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०९७/ प्र.क्र.२०/ ९७/ बारा,दिनांक २७ नोव्हेंबर, १९९७

## शासन परिपत्रक

आदिवासी क्षेत्रात शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी उत्साही तरुण व कार्यक्षम कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक ७ जानेवारी, १९९१ च्या परिपत्रकान्वये आदेशित करण्यात आले होते. आदिवासी क्षेत्रातील बिकट परिस्थिती, लक्षात घेता, तेथे नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय सेवकांनी आदिवासी क्षेत्रात किमान ५ वर्षे चांगली सेवा केल्यानंतर, त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली मागितली तर त्या सेवकास अग्रक्रमाने पसंतीच्या ठिकाणी बदली करण्यासंबंधी सूचना सदर परिपत्रकान्वये निर्गमित केल्या होत्या.

२. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २७ नोव्हेंबर,१९९७ च्या परिपत्रकानुसार शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्यासंदर्भात सर्वसाधारण स्वरुपाची मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. या मार्गदर्शक तत्वांचे संदर्भात आदिवासी क्षेत्रातील कर्मचारी/अधिकारी यांच्या बदल्यासंबंधी दिनांक ७ जानेवारी,१९९१ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत आता **सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या** आदिवासी क्षेत्रांकरीता खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

अ) आदिवासी क्षेत्रात ३ वर्षे चांगले काम केलेल्या गट 'क' व गट'ड' च्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या जिल्हयात सोईप्रमाणे नेमणूका देण्यात याव्यात.

ब) आदिवासी क्षेत्रात किमान २ वर्षे चांगले काम केलेल्या गट 'अ' व 'ब' च्या अधिकाऱ्यांना देखिल त्यांच्या पसंतीच्या जिल्हयात सोईनुसार नेमणूका देण्यात याव्यात.

क) वरीलप्रमाणे पसंतीच्या जिल्हयांत बदली मिळण्यासाठी,आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी उपरोक्त विहित कार्यकाळ संपण्यापूर्वी किमान ३ महिने आधी त्यांच्या पसंतीच्या जिल्हयांची तीन नावे सक्षम प्राधिकाऱ्यांना कळवावीत व त्याची प्रत तो कार्यरत असलेल्या क्षेत्राच्या जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांना देण्यात यावी.

ड) मात्र महसूल व पोलिस विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वत:च्या किंवा कुटुंबियांच्या नावे स्थावर मालमत्ता असलेली ठिकाणे वगळून त्यांच्या मूळच्या अन्य जिल्हयातील ठिकाणी नेमणूका देण्यात याव्यात.

३. आदिवासी विकास विभाग व आदिवासी विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा आदिवासी क्षेत्राकरीताच असल्यामुळे त्यांना तसेच स्थानिक रहिवाशी असलेल्या इतर विभागातील कर्मचारी यांना वरील सवलतीचा लाभ मिळणार नाही.

४. अधिकारी/कर्मचारी यांचेकडून बदलीसाठी पसंतीक्रम प्राप्त होताच सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधितांचा विहित कार्यकाल संपताच त्यांच्या पसंतीच्या जिल्हयात बदलीसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. काही प्रशासकीय कारणास्तव पसंतीच्या जिल्हयात लगेचच बदली करणे शक्य नसल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने अशी प्रकरणे तातडीने वरिष्ठांचे /शासनाचे निदर्शनास आणून देऊन त्यांचे आदेश प्राप्त करावेत व संबंधितास तसे कळवून त्यास अन्यत्र बदली दयावी. मात्र, असे करताना संबंधितांनी बदलीसाठी दिलेला पसंतीचा हक्क पुढील तीन वर्षेपर्यन्त कायम ठेवून या वाढीव कालावधीत पसंतीच्या जिल्हयात बदली देणे आवश्यक राहील.

५. आदिवासी विकास विभागाने त्यांच्या शासन निर्णय, क्रमांक-टीएसटी-१०८६/८७१०/ प्र.क्र.३१/ का-५, दिनांक-९.३.१९९० अन्वये घोषित (सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे) केलेल्या आदिवासी क्षेत्रात वरीलप्रमाणे काम केले असल्यासच अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या जिल्हयात नेमणूक देण्यात यावी.

६. या आदेशानुसार विहित कालावधीनंतर पसंतीच्या ठिकाणी बदली करण्यासंदर्भातील समन्वयाचे काम गट'ड' व गट'क' मधील कर्मचाऱ्यांच्याबाबतीत ते कार्यरत असलेल्या जिल्हयांचे जिल्हाधिकारी व गट'ब' (अराजपत्रितसुध्दा) व गट'अ' मधील अधिकाऱ्यांच्याबाबतीत संबंधित विभागीय आयुक्त करतील.

७. आदिवासी क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांना या व्यतिरिक्त प्रोत्साहनपर इतर सवलती देण्याचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

८. हे आदेश राज्य सेवेतील अधिकारी/ कर्मचारी तसेच जिल्हा परिषद/ महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/ निमशासकीय कार्यालये/महामंडळे व शासन अंगीकृत व्यवसाय या सर्वांना लागू रहातील.

९. सर्व विभागांनी या आदेशाच्या तरतुदीनुसार त्यांच्या अखत्यारीतील आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी नेमणुका देण्याबाबत कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. कृ.लोखंडे,
उप सचिव,महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्रमांक- टीआरएफ २००० /एम/८/प्र.क्र.३/२०००/बारा,दिनांक ११ जुलै,२००० सोबतचे "परिशिष्ट" (शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक टीएफपी-१०९६/८७१०/प्र.क्र.३१/का-५,दिनांक ९ मार्च,१९९० अन्वये घोषित केलेल्या आदिवासी क्षेत्राची सूची.)

| अनुक्रमांक<br>१. | जिल्ह्याचे नाव<br>२. | पूर्णतः आदिवासी उपयोजना क्षेत्राखाली येणारे तालुके.<br>३. | अंशतः आदिवासी उपयोजना क्षेत्राखाली येणारे तालुके.<br>४. |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | अ) डहाणू | अ) पालघर |
| | | ब) तलासरी | ब) वसई |
| | | क) मोखाडा | क) भिवंडी |
| | | ड) जव्हार | ड) मुरबाड |
| | | इ) वाडा | |
| | | फ) शहापूर | |
| २ | नाशिक | अ) कळवाण | अ) बगलान |
| | | ब) सुरगणा | ब) दिंडोरी |
| | | क) पेंट | क) इगतपुरी |
| | | | ड) नाशिक |
| ३ | धुळे | - | अ) साक्री |
| | | | ब) शिरपूर |
| ४ | नंदुरबार | अ) तळोदा | अ) नंदूरबार |
| | | ब)अक्राणी (धडगाव) | |
| | | क) अक्कलकुवा | |
| | | ड)नवापूर | |
| ५ | जळगाव | - | अ)चोपडा |
| | | | ब) यावल |
| | | | क)रावेर |
| ६ | अहमदनगर | - | अ) अकोला |
| ७ | पुणे | - | अ) जुन्नर |
| | | | ब) आंबेगाव |
| ८ | नांदेड | - | अ) किनवट |
| ९ | अमरावती | अ) धारणी | - |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ब) चिखलदरा | |
| १० | यवतमाळ | - | अ) मारेगाव |
| | | | ब) राळेगाव |
| | | | क)केळापूर |
| | | | ड) घाटंजी |
| ११ | गडचिरोली | अ)सिरोंचा | अ) गडचिरोली |
| | | ब) अहेरी | ब) आरमोरी |
| | | क) इटापल्ली | क) चामोरशी |
| | | ड) धानोरा | |
| | | इ)कुरखेडा | |
| १२ | चंद्रपूर | - | अ) राजुरा |

अतिरिक्त आदिवासी उपयोजनेत समावेश करण्यात आलेले अंशतः क्षेत्र.

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुके | |
|---|---|---|---|
| १ | रायगड | अ) कर्जत | |
| २ | नागपूर | अ) रामटेक | |
| ३ | गोंदिया | अ) सालेकसा | |
| | | ब) अर्जुनी मोरगाव | |
| | | क)देवरी | |
| ४ | पुणे | अ) खेड | |
| ५ | यवतमाळ | अ) यवतमाळ | |
| | | ब) बाभूळगाव | |
| | | क) कळंब | |
| | | ड) पुसद | |
| | | इ) महागाव | |
| | | ई) उमरखेड | |
| ६ | चंद्रपूर | अ) गोंडपिंपरी | |
| | | ब) मूल | |
| | | क) चंद्रपूर | |
| | | ड) नागभीड | |
| | | इ) सिंदेवाही | |
| | | ई) ब्रम्हपुरी | |
| | | ग)चिमूर | |
| | | ह) वरोरा | |
| | | ल)भद्रावती | |

**नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रम-**
**कार्यक्रम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहित करणे, विविध सवलतीचे एकत्रित आदेश निर्गमित करणे.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक:टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ६ ऑगस्ट, २००२.

वाचा :-१) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक:विकृका-१०८८/प्र.६४/योजना/१२, दिनांक १९ जानेवारी,१९८९.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक:टीएसपी-१०८६/८७१०/ प्र.क्र.३१/का.५, दिनांक ९ मार्च,१९९०.
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक:आस्था-१०९३/प्र.क्र.२४५/ ९३/का.३, दिनांक २१ डिसेंबर,१९९३.
४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक:आस्था-१०९७/प्र.क्र.१८/ का.१५, दिनांक १४ ऑगस्ट,१९९७.
५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक:आस्था-१०९७/प्र.क्र.१८/ का.१५, दिनांक ५ फेब्रुवारी,१९९९.
६) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०९०/प्र.क्र.११/ ९०/बारा, दिनांक ७ जानेवारी,१९९१.
७) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक :एसआरव्ही-१०९७/ प्र.क्र.२०/९७/बारा, दिनांक २७ नोव्हेंबर,१९९७.
८) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:टीआरएफ-२०००/एम-८/ प्र.क्र.३/बारा, दिनांक ११ जुलै,२०००.

घनदाट जंगलाने व्यापलेल्या चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम व मागासलेल्या आदिवासी भागाचा जलद गतीने विकास व्हावा यासाठी शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक:विकृका-१०८८/प्र.६४/ योजना-१२, दिनांक १९ जानेवारी,१९८९ अन्वये विशेष कृती कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-४ परिच्छेद-२ (२) मध्ये सर्व विभागांनी गडचिरोली जिल्हा चंद्रपूर जिल्ह्याच्या निवडक क्षेत्रात चांगल्या, होतकरु व कार्यक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची बाब अंतर्भूत करण्यात आली आहे. तथापि, या संदर्भात निश्चित स्वरुपाची मार्गदर्शक तत्वे सुस्पष्टपणे विहित केलेली नव्हती. त्यामुळे राज्यातील सर्वच आदिवासी/नक्षलग्रस्त भागात अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी काही मार्गदर्शक तत्वे विहित करण्याचे शासनाचे विचाराधीन होते.

आदिवासी क्षेत्रातील बिकट परिस्थितीत शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना त्या भागात काम करताना येणाऱ्या विविध अडचणींचा विचार करुन तसेच नक्षलग्रस्त/संवेदनशील भागात (जिवितांची) सुरक्षितता इत्यादी बाबी लक्षात घेवून त्यांना काही प्रोत्साहनपर सवलतीही देण्यात आलेल्या आहेत. आदिवासी भागाच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या शासनाच्या विविध योजनांचा पुरेपूर लाभ तेथील जनतेला मिळावा; त्यांचा विकास व्हावा यासाठी तळमळीने काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी दूर व्हाव्यात आणि त्यांना जोमाने काम करण्यास प्रोत्साहन

मिळावे याकरिता विविध सवलती देण्यात आलेल्या आहेत. त्यात सुधारणा करणे तसेच काही अतिरिक्त सवलती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आदिवासी/नक्षलग्रस्त भागातील प्रशासन हे तेथील जनतेच्या अडीअडचणींबद्दल जागरुक, संवेदनशील व कार्यशील होण्यासाठी त्या भागात अधिकारी वर्ग अतिशय काळजीने नियुक्त करणे आवश्यक आहे. या दृष्टीने विचार करुन ***राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात होतकरू, संवेदनशील व कार्यक्षम अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देत आहे :-***

(१) अखिल भारतीय सेवेतील भारतीय प्रशासन सेवा, भारतीय पोलीस सेवा व भारतीय वन सेवामधील कनिष्ठ वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवेतील पहिली नियुक्ती (उप विभागीय अधिकारी अथवा उप विभागीय जिल्हाधिकारी, उप विभागीय पोलीस अधिकारी अथवा सहाय्यक पोलीस अधीक्षक वा सहाय्यक वन संरक्षक ह्या सारख्या पदांवरील नियुक्ती) आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात पदांच्या उपलब्धतेनुसार करावी.

(२) कनिष्ठ वेतनश्रेणीवरुन वरिष्ठ वेतनश्रेणीत पदोन्नती देतांना ह्या तीन अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना या भागात किमान तीन वर्षासाठी नेमण्यात यावे. उपलब्ध अधिकाऱ्यांपैकी कर्तबगार व उत्साही अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक अथवा उप वन संरक्षक या पदावर नेमणूक व्हावी.

(३) सेवेत पदोन्नतीनंतरची पहिली नेमणूक पदांच्या उपलब्धतेनुसार नक्षलग्रस्त भागात करावी.

(४) राज्य सेवेतील ज्या संवर्गातील अधिकाऱ्यांची पदस्थापना आदिवासी क्षेत्रात होत आहे. त्यांच्याबाबत देखील वरील (१) ते (३) येथील मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

(५) वयाची ५० वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांची शक्यतो या भागात नियुक्ती करु नये.

(६) नक्षलग्रस्त/आदिवासी (विशेष घटक योजना) भागात एकदा नेमणूक झाल्यावर अशा अधिकाऱ्यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.टीआरएफ-२०००/एम-८/प्र.क्र.३/१२, दि.११ जुलै, २००० अन्वये विहित केलेला किमान कालावधी पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही कारणास्तव बदलण्यात येऊ नये. मात्र विभागीय चौकशीचे आदेश झाल्यास, मुदतपूर्व बदली करता येईल.

(७) नक्षलग्रस्त/आदिवासी (विशेष घटक योजना) भागात नेमणूक झाल्यानंतर त्या ठिकाणी रुजू न होणाऱ्या/बदली रद्द करण्याचा प्रयत्न करणाऱ्या किंवा रजेवर जाणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द 'शासन आदेशांच्या अनुपालनाची टाळाटाळ करणे' या कारणावरुन शिस्तभंगविषयक कठोर कार्यवाही करण्यात यावी.

(८) नक्षलग्रस्त/आदिवासी (विशेष घटक योजना) भागातील पदे रिकामी ठेवू नये. अधिकाऱ्यांची नियुक्तीसाठी कमतरता असल्यास इतरत्र पदे रिक्त ठेवून या भागात अधिकाऱ्यांच्या नेमणूका कराव्यात.

(९) नक्षलग्रस्त /विशेष घटक योजना भागातील कार्यकालात अधिकाऱ्यांनी संपूर्णकाळ मुख्यालयी हजर राहणे आवश्यक राहील. वरिष्ठांच्या पूर्व परवानगीशिवाय कार्यक्षेत्र सोडून इतरत्र जाता येणार नाही.

(१०) वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नक्षलग्रस्त भागास वारंवार भेटी देवून/तपासणी करुन कार्यरत अधिकाऱ्यांचे मनोबल वाढविण्याचे तसेच त्यांच्या अडचणी तेथल्यातेथे (on spot) दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

(११) अधिकाऱ्यांनी नक्षलग्रस्त भागातील त्यांनी केलेल्या उत्तम कामाची विशेष नोंद प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी गोपनीय अभिलेखात करावी.

(१२) अधिकारी/कर्मचारी यांचा आदिवासी क्षेत्रातील किमान कार्यकाल समाधानकारक संपल्यानंतर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकःठिकारएफ- २०००/एम-८/प्र.क्र.३/बारा,दिनांक ११ जुलै, २००० मधील सूचनांनुसार पुढील पदस्थापना पसंतीच्या ठिकाणी अनुज्ञेय होईल.

२. राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सद्यःस्थितीत अनुज्ञेय असलेल्या विविध सवलती खालील विवरणपत्रातील स्तंभ २ प्रमाणे सुधारीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

| <u>प्रचलित सवलत</u> | सुधारित सवलत |
|---|---|
| <u>*(अ) निवासस्थान:*</u><br>(१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.आस्था-१०९३/प्र.क्र.२४५/का.३,दिनांक२१डिसेंबर, १९९३ अन्वये संवेदनशील ठरविलेल्या ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रात कार्यरत असलेल्या शासकीय व जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना "भाडेमाफ निवासस्थानाची" सुविधा उपलब्ध राहील. मात्र ही सुविधा बदलीपात्र कर्मचाऱ्यांपुरतीच मर्यादित असेल. | (१) काही बदल नाही. |
| (२) आदिवासी क्षेत्रात नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यास आदिवासी क्षेत्रात नियुक्ती होण्यापूर्वीच्या ठिकाणचे निवासस्थान कुटुंबियांकरीता २ वर्षांपर्यंत स्वत:कडे ताब्यात ठेवता येईल. मात्र त्यासाठी नियमानुसार भाडे अदा करावे लागेल. | (२) आदिवासी क्षेत्रात नियुक्ती होण्यापूर्वीच्या ठिकाणचे शासकीय निवासस्थान कुटुंबियांकरीता दोन वर्षांपर्यंत ताब्यात ठेवण्याची सध्याची सवलत तीन वर्षे किंवा कर्मचारी आदिवासी क्षेत्रात असेपर्यंतचा कालावधी यापैकी जो कमी असेल त्या कालावधीपर्यंत वाढविण्यात यावी.<br><br>मात्र कर्मचाऱ्याच्या मूळ नियुक्तीच्या ठिकाणच्या शासकीय निवासस्थानाकरीता नियमित भाडे आकारण्यात यावे आणि आदिवासी क्षेत्रातील शासकीय निवासस्थानाकरीता केवळ सेवाशुल्क वसूल करण्यात यावे. या प्रकारे कर्मचाऱ्यास एका वेळी जास्तीत जास्त २ शासकीय निवासस्थान स्वत:कडे राखता येतील. |

<table>
<tr>
<td>
(ब) प्रोत्साहन भत्ता :<br>
शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,<br>
क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५,दि.५फेब्रुवारी,१९९९<br>
अनुसार आदिवासीक्षेत्रात कार्यरत असलेल्या :<br>
(अ) शासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचारी<br>
(ब ) जिल्हा परिषदांचे अधिकारी व कर्मचारी.<br>
(क) अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील पूर्णकालीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.<br>
(ड) कृषि व पशु व कृषितर विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी<br>
यांना खालील प्रमाणे प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे :-<br>
<table>
<tr><th>वेतनश्रेणी</th><th>प्रोत्साहन भत्त्याचे दर</th></tr>
<tr><td>रुपये ३,०००/- पेक्षा कमी</td><td>रुपये १००/-</td></tr>
<tr><td>रुपये ३,०५०/- ते ४,५८९/-</td><td>रुपये २००/-</td></tr>
<tr><td>रुपये ४,५९०/- ते ६,४९९/-</td><td>रुपये ३००/-</td></tr>
<tr><td>रुपये ६,५००/- ते ९,९९९/-</td><td>रुपये ४००/-</td></tr>
<tr><td>रुपये १०,०००/- व पुढे</td><td>रुपये ५००/-</td></tr>
</table>
</td>
<td>
१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,दि.५ फेब्रुवारी, १९९९ नुसार अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रुपये २०० ते कमाल रुपये १५०० दरमहा या मर्यादेत अनुज्ञेय राहील.<br>
२)सर्वसाधारण आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सध्या देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्याच्या रकमेत मात्र कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही.<br>
३) दि.५/२/१९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ (७) मधील "आदिवासी उपयोजना क्षेत्रातील समाविष्ट महानगरपालिका/नगर परिषदेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मात्र उपरोक्त वाढीव प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही" ही अट या प्रयोजनार्थ रद्द करण्यात येत आहे.
</td>
</tr>
<tr>
<td>
(क) प्रोत्साहन भत्त्याच्या अटी:-<br>
शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५,दि.५फेब्रुवारी,१९९९ अनुसार प्रोत्साहन भत्यासाठी खालीलप्रमाणे अटी विहित केल्या आहेत.<br>
१) प्रोत्साहन भत्ता अंशकालीन कर्मचारी व नैमित्तीक कर्मचारी यांना अनुज्ञेय राहणार नाही.<br>
२) ज्या जिल्हा,तालुका व नगरपालिकेची ठिकाणे आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट नाहीत (दि.९ मार्च,१९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे) अशा ठिकाणी ज्या कर्मचाऱ्यांची मुख्यालये/कार्यालये आहेत अशा कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय होणार नाही.<br>
३) जास्तीत जास्त एका महिन्याच्या अर्जित रजेच्या कालावधीसाठी प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहील. परंतु प्रत्यार्पित रजेच्या कालावधीसाठी (रजा रोखीकरणासाठी) अनुज्ञेय असणार नाही.<br>
४)निलंबनाधिन असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचा निलंबन काळ कर्तव्य काळ म्हणून गणला गेला तरी प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय होणार नाही.<br>
५) शिक्षेनंतर सेवामुक्त केलेल्या अथवा बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यास पुन्हा सेवेत घेऊन त्यांचा खंडीत सेवाबाह्य कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित केल्यास त्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.<br>
६) दि. ९ मार्च,१९९० च्या शासन निर्णयान्वये आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या ज्या गावांचा महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रामध्ये समावेश झाला असेल आणि त्या महानगरपालिका /नगरपालिका आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट नसतील तर त्या गावातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय होणार नाही.
</td>
<td>
शा.नि.आदिवासी विकास विभाग,क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५,दि. ५ फेब्रुवारी,१९९९ अन्वये प्रोत्साहन भत्यासाठी विहित केलेल्या अटींमध्ये फक्त अट क्रमांक-२ आणि ६ वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित क्र.१ तसेच क्र.३ ते ५ येथील अटींमध्ये कोणताही बदल नाही.
</td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| ***(ब)बदलीसाठी पसंती: शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक.टीआरएफ-२०००/एम-८/प्र.क्र.३/ बारा, दिनांक ११ जुलै, २००० अन्वये खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत:***<br>१) आदिवासी क्षेत्रात ३ वर्षे चांगले काम केलेल्या गट 'क' व गट 'ड' च्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या जिल्ह्यात सोईप्रमाणे नेमणूका देण्यात याव्यात.<br>२) आदिवासी क्षेत्रात किमान २ वर्षे चांगले काम केलेल्या गट 'अ' व 'ब' च्या अधिकाऱ्यांना देखिल त्यांच्या पसंतीच्या जिल्ह्यात सोईनुसार नेमणूका देण्यात याव्यात.<br>३) वरीलप्रमाणे पसंतीच्या जिल्ह्यात बदली मिळण्यासाठी, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी उपरोक्त विहित कार्यकाळ संपण्यापूर्वीच किमान ३ महिने आधी त्यांच्या पसंतीच्या जिल्ह्यांची तीन नावे सक्षम प्राधिकाऱ्यांना कळवावीत व त्याची प्रत तो कार्यरत असलेल्या क्षेत्राच्या जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांना देण्यात यावी.<br>४) मात्र, महसूल व पोलिस विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या किंवा कुटुंबियांच्या नावे स्थावर मालमत्ता असलेली ठिकाणे वगळून त्यांच्या पसंतीच्या अन्य जिल्ह्यातील ठिकाणी नेमणूका देण्यात याव्यात.<br>५) आदिवासी विकास विभाग व आदिवासी विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा आदिवासी क्षेत्राकरीताच असल्यामुळे त्यांना तसेच स्थानिक रहिवाशी असलेल्या इतर विभागातील कर्मचारी यांना वरील सवलतीचा लाभ मिळणार नाही.<br>६) अधिकारी/कर्मचारी यांचेकडून बदलीसाठी पसंतीक्रम प्राप्त होताच सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधितांचा विहित कार्यकाल संपताच त्यांच्या पसंतीच्या जिल्ह्यात बदलीसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. काही प्रशासकीय कारणास्तव पसंतीच्या जिल्ह्यात लगेचच बदली करणे शक्य नसल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने अशी प्रकरणे तातडीने वरिष्ठांचे/शासनाचे निदर्शनास आणून देवून त्यांचे आदेश प्राप्त करावेत व संबंधितास तसे कळवून त्याना अन्यत्र बदली द्यावी. मात्र, असे करताना संबंधितांनी बदलीसाठी दिलेला पसंतीचा हक्क पुढील तीन वर्षापर्यन्त कायम ठेवून या वाढीव कालावधीत पसंतीच्या जिल्ह्यात बदली देणे आवश्यक राहील. | शा.नि.सा.प्र.वि.क्र.टीआरएफ-२०००/एम-८/प्र.क्र.३/ बारा, दिनांक ११ जुलै,२००० अन्वये विहित केलेल्या १ ते ६ येथील मार्गदर्शक सूचनांमध्ये कोणताही बदल करण्याचे प्रस्तावित नाही. |

**३. वरील परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या प्रचलित सवलती व्यतिरिक्त आदिवासी/नक्षलग्रस्त भागातील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे अतिरिक्त सवलती मंजूर करण्यात येत आहेत :-**

(१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक:आस्था-१०९३/प्र.क्र.२४५/९३/का.१५, दिनांक:२९/१२/९३ अन्वये संवेदनशील ठरविलेल्या ११ एकात्मिक आदिवासी प्रकल्पातील क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांसाठी जी भाडेमाफ निवासस्थानाची सुविधा देण्यात आली आहे, ती यापुढे सदर क्षेत्राव्यतिरिक्त शासनाने वेळावेळी विविक्षितपणे घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागालादेखील लागू होईल.

तथापि, उपयोजना क्षेत्रातील एका संवेदनशील भागातून दुसऱ्या संवेदनशील भागात बदली झाल्यास कर्मचाऱ्यास पहिल्या संवेदनशील भागातील निवासस्थान रिक्त करावे लागेल. तथापि, उपयोजना क्षेत्राबाहेरील निवासस्थान कर्मचारी आदिवासी क्षेत्रात असेपर्यन्त वरील परिच्छेद-२(अ) प्रमाणे स्वत:च्या ताब्यात ठेवू शकेल. भाडेमाफ निवासस्थानाबाबत शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक:आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५, दिनांक १४ ऑगस्ट,१९९७ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

(२) आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आदिवासी क्षेत्राबाहेर वास्तव्यास असलेल्या त्यांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी वर्षातून २ वेळा कार्यालयीन सोईनुसार देय व अनुज्ञेय रजा आगाऊ मंजूर करुन घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येईल. त्यासाठी अनुज्ञेय मार्गाने/ साधनाने केलेल्या प्रवास खर्चाची अनुज्ञेय दराने शासन प्रतिपूर्ती करेल.

ही सवलत नियमित स्वग्राम प्रवास सवलती व्यतिरिक्त असेल.

(३) आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी स्वयंचलित दुचाकी वाहन खरेदीसाठी अग्रिम मागितल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या अर्जास सर्वप्राधान्य देण्यात यावे.

(४) पोलीस पदकासाठी आवश्यक केलेली १५ वर्षांच्या सेवेची अट आदिवासी क्षेत्रासाठी शिथिल करावी.

(५) नक्षलवाद्यांशी सशस्त्र चकमक उडाल्यास आणि या चकमकीत नक्षलवादी ठार झाल्यास संबंधित पोलीसांना विशेष पदक देण्यात यावे.

(६) संवेदनशील/नक्षलग्रस्त भागात कर्तव्यावर असतांना चकमकीत मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांस रु. २ लक्ष एवढे आर्थिक सहाय्य एकवेळची बाब म्हणून देण्यात यावे.

(७) ***सर्व पदांसाठी एकस्तर पदोन्नती :-***

आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट **'अ'** ते **'ड'** मधील सर्व पदधारकांना संबंधित कर्मचारी/अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यन्तच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मूळ पदाच्या नजीकची वरिष्ठ/ पदोन्नतीची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतननिश्चितीचा लाभ

देण्यात यावा. ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे त्यांना आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल. ही एकस्तर पदोन्नतीची योजना दि.१ जुलै,२००२ पासून अंमलात येईल आणि ती संबंधित कर्मचारी/अधिकारी आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असेपर्यन्तच अनुज्ञेय राहील. त्या क्षेत्रातून कर्मचारी/अधिकारी बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर तो त्याच्या मूळच्या संवर्गातील वेतनश्रेणीत पूर्वीच्या वेतनाच्या अनुषंगाने वेतन घेईल.

४. या आदेशाद्वारे अनुज्ञेय करण्यात आलेल्या विविध सुधारित व नवीन सवलती सदर आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि, परिच्छेद ३(७) मधील एकस्तर पदोन्नतीची सवलत दिनांक १ जुलै,२००२ पासून अंमलात येईल.

५. विविध विभागांच्या नियंत्रणाखालील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वरील परि.२ व ३ मधील सवलती मंजूर केल्यामुळे येणारा आर्थिक भार संबंधित विभागाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सर्व विभागांनी आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या त्यांच्या विभागातील महामंडळे, इतर स्वायत्त संस्थामधील तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालये अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत वर नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून सुयोग्य व्यक्तिच्या त्या त्या क्षेत्रात नियुक्त्या कराव्यात. तसेच त्या क्षेत्रात काम करीत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सर्व सुविधा/सवलती देण्याबाबतच्या सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:६७९/सेवा-५, दिनांक २४/६/२००२ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्रकाश लोखंडे
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

**शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यासंदर्भात धोरण.....**

**आदिवासी क्षेत्रात अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-२००२/प्र.क्र.१/२००२/बारा,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक: ३० ऑगस्ट,२००२

संदर्भ:- (१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,शाकानि-१०८९/११६/१८,(र.व का.), दि. ५ मे,१९८९

(२) शासन पृष्ठांकन, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-टिआरएफ-१०९५/ प्र.क्र.३८/९५/बारा. दिनांक - १८ ऑक्टोबर,१९९५

(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०९७/ प्र.क्र.२०/९७/बारा, दिनांक - २७ नोव्हेंबर,१९९७

(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- टिआरएफ-२०००/ एम-८/प्र.क्र.२/बारा, दिनांक ११ जुलै,२०००

**परिपत्रक**

संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २७ नोव्हेंबर,१९९७ च्या शासन निर्णयानुसार शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्याच्या नियतकालीक बदल्यांसाठी सर्वसाधारण स्वरुपाच्या मार्गदर्शक सुचना विहित करण्यात आलेल्या आहेत. शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या गटाप्रमाणे कमीत कमी किती वर्षानंतर कराव्यात,त्याचा कालावधी व बदल्या करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यासंदर्भात सविस्तर निदेश सदर शासन निर्णयात समाविष्ट आहेत. संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक ११ जुलै,२००० च्या शासन निर्णयानुसार आदिवासी क्षेत्रात शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांना प्रोत्साहन म्हणून त्या क्षेत्रात चांगल्याप्रकारे काम केल्यानंतर विहित मुदतीनंतर त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्याची सवलत दिलेली आहे.

२. संदर्भाधीन दिनांक २७ नोव्हेंबर,१९९७ च्या शासन निर्णयाव्दारे विहित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसारच सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जाणे आवश्यक आहे. तथापि, बऱ्याच प्रकरणात या मार्गदर्शक सुचनांकडे दुर्लक्ष होत आहे किंवा त्यांचे उल्लंघन होत आहे असे निदर्शनास आलेले आहे. परिणामी न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात व अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्यांना न्यायालयाकडून स्थगिती मिळते असे निदर्शनास आलेले आहे. वैयक्तिक एखाद्या बदलीस न्यायालयाकडून स्थगिती मिळाल्यास त्या अनुषंगाने प्रस्तावित केलेल्या साखळीतील इतर बदल्या (Chain of Transfer) विस्कळीत होतात आणि त्यामुळे प्रशासकीय अडचणी देखील उद्भवतात. हे सर्व टाळण्याकरीता संदर्भाधीन दिनांक २७ नोव्हेंबर,१९९७ तसेच दिनांक ११ जुलै,२००० मधील सुचनांचे/निदेशांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे याची सक्षम प्राधिकाऱ्याने पुरेशी दक्षता घेणे आवश्यक आहे. आदिवासी क्षेत्रातील बदली ही शिक्षा म्हणून केली जात असल्याची भावना अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण होऊ नये आणि परिणामी ती प्रकरणे न्यायप्रविष्ट होऊ नयेत याची पुरेशी काळजी बदल्या करण्यापूर्वी घेणे जरुरीचे आहे.

३. प्रशासकीय आणि पुरेशा समर्थनीय कारणास्तव करण्यात आलेल्या बदल्यांसंबंधी प्रशासकीय न्यायाधिकरणाने हस्तक्षेप करु नये अशा स्वरुपाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने मध्यप्रदेश शासन व इतर विरुध्द श्री. एस. एस. कौरव व इतर या सिव्हील अपील क्र.१२८५/१९९५ या प्रकरणात दिनांक १९ जानेवारी,१९९५ रोजी दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त निर्देश संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १८ ऑक्टोबर,१९९५ च्या पृष्ठांकनाव्दारे सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना यापूर्वीच उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आलेले होते. त्याचा या ठिकाणी पुनरुच्चार करण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सदर निर्देश शीघ्र अवलोकनासाठी खाली नमूद करण्यात येत आहेत:-

***"The Courts or Tribunals are not appellate forums (sice) to decide on transfer of officers on administrative grounds. The wheels of administration should be allowed to run smoothly and the Courts or Tribunals are not expected to interdict the working of the administrative system by transferring the officers to proper places. It is for administration to take appropriate decision and such decision shall stand unless they are vitiated either by malafides or by extraneous consideration without any factual background foundation."***

४. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीने आदिवासी योजनांचा घेतलेल्या आढाव्यात आदिवासी क्षेत्रात अधिकारी/कर्मचारी यांच्या केलेल्या बदल्यासंबंधात प्रशासकीय न्यायाधिकरणाकडून बऱ्याच प्रकरणात स्थगिती मिळविली जाते या बाबीचा देखील विचार झाला होता. या सर्व बाबींचा विचार करुन शासन आता खालीलप्रमाणे निदेश देत आहे:-

१) प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या आदिवासी क्षेत्रातील बदल्या/पदस्थापना याबाबत न्यायालये/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात प्रकरण दाखल झाल्यास वर नमूद केलेले सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश मा.न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणून देवून शासनाची बाजू समर्थपणे न्यायाधिकरणाकडे मांडावी.

२) प्रशासकीय न्यायाधिकरणाकडून आदिवासी क्षेत्रात करण्यात आलेल्या बदल्या/पदस्थापना यांना स्थगिती देण्यात आल्यास, संबंधित विभागांनी अत्यंत तातडीने त्या निर्णयाविरुध्द उच्च न्यायालयात अपील दाखल करावे व न्यायालयास शासनाची बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करावा.

३) बदल्या संदर्भात मंत्री महोदयांनी काही आदेश व सूचना दिलेल्या असल्या आणि त्याची अंमलबजावणी करणे अडचणीचे ठरत असल्यास संबंधित विभागांनी अशी प्रकरणे, त्यातील अडचणी/त्यामुळे होणारे परिणाम आणि वस्तुस्थिती नमूद करुन उचित समर्थनासह असे प्रस्ताव मा.मंत्री महोदयांच्या फेरविचारासाठी संबंधित मा.राज्यमंत्री/मा.मंत्री/मा.मुख्यमंत्री यांना मुख्य सचिवांच्यामार्फत सादर करावेत. या संदर्भात शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-शाकानि-१०८९/११६/१८,(र.व का.),दिनांक ५ मे,१९८९ अनुसार दिलेल्या सूचनांनुसार विभागांनी कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

४) सध्या बदल्यांना स्थगिती असल्याने अगदी अनिवार्य प्रकरणात बदल्यांवरील स्थगिती अंशतः शिथील करुन बदल्या/पदस्थापना करावयाची असल्यास त्यासाठी बदलीचे अनिवार्य कारण स्पष्टपणे नमूद करुन मा.मुख्यमंत्र्यांची पूर्वानुमत्ती घेणे आवश्यक आहे. बदल्यांवर स्थगिती असतानाच्या काळात मा.मुख्यमंत्र्यांच्या पुर्वानुमतीशिवाय कोणत्याही परिस्थितीत बदल्या होणार नाहीत. तसेच मा.मुख्यमंत्र्यांची कार्योत्तर मान्यता घेण्याचे एकही प्रकरण होणार नाही याची काळजी संबंधित विभागीय सचिवांनी घेणे आवश्यक आहे. या संबधातील या विभागाने दिलेल्या सर्वसामान्य सुचनांचे कटाक्षाने पालन केले जाईल याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

बा. क. अग्रवाल
अपर मुख्य सचिव (सेवा),महाराष्ट्र शासन

**नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रम-**
**कार्यक्रम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहित करणे, विविध सवलतींचे एकत्रित आदेश निर्गमित करणे.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:टीआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ५ सप्टेंबर, २००२.

वाचा :- शासन निर्णय क्रमांक-सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-टीआरएफ/ २०००/ प्र.क्र.३/बारा, दि.६ ऑगस्ट, २००२ .

## शासन निर्णय

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-टीआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा, दि.६ ऑगस्ट, २००२ अन्वये राज्यातील सर्व आदिवासी / नक्षलग्रस्त भागात अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी काही मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली असून विविध सवलतींचे एकत्रीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णयातील परि २ मधिल मुद्दा (क) च्या समोरील सुधारित सवलतीच्या स्तंभातील शेवटची ओळ "क्र.२ ते ५ येथील अटींमध्ये कोणताही बदल नाही."
ऐवजी "क्र.१ ते ५ येथील अटींमध्ये कोणताही बदल नाही." अशी सुधारित स्वरुपात वाचण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

प्रकाश लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रम-
कार्यक्रम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी
मार्गदर्शक तत्वे विहित करणे, विविध सवलतींचे
एकत्रित आदेश निर्गमित करणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/करा.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १२ फेब्रुवारी,२००३.

वाचा :- (१) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग,क्रमांक:आस्था-१०९७/
प्र.क्र.१८/का.१५, दि.५ फेब्रुवारी,१९९९.
(२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-टीआरएफ/
२०००/ प्र.क्र.३/कारा, दि.६ ऑगस्ट, २००२ .
(३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-टीआरएफ/
२०००/ प्र.क्र.३/कारा, दि.५ सप्टेंबर, २००२ .

**शासन निर्णय**

संदर्भाधीन क्रमांक-२ येथील दि.६ ऑगस्ट,२००२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व आदिवासी / नक्षलग्रस्त भागात अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी काही मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली असून विविध सवलतींचे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ मधील मुद्दा (क) मध्ये संदर्भाधिन ३ येथील दि.५ सप्टेंबर,२००२ च्या शासन निर्णयानुसार सुधारणा करण्यात आली होती. सदर दिनांक ५ सप्टेंबर,२००२ चे आदेश रद्द करुन संदर्भाधिन २ येथील दि.६ ऑगस्ट,२००२ च्या शासन निर्णयातील परि.२ (क) समोरील सुधारीत सवलतींच्या स्तंभ क्र.२ मधील तरतुद खालीलप्रमाणे सुधारीत स्वरुपात वाचण्यात यावी :-

" <u>शा.नि.आदिवासी विकास विभाग,क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५,दि. ५ फेब्रुवारी,१९९९ अन्वये प्रोत्साहन भत्त्यासाठी विहित केलेल्या अटींमध्ये फक्त अट क्रमांक-२ आणि ६ वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित क्र.१ तसेच क्र.२ ते ५ येथील अटींमध्ये कोणताही बदल नाही."</u> च्या ऐवजी "शा.नि.आदिवासी विकास विभाग,क्र.आस्था-१०९७/ प्र.क्र.१८/का.१५, दि.५ फेब्रुवारी,१९९९ मधील प्रचलित सवलतीतील स्तंभ-१ ((ख) प्रोत्साहन भत्त्याच्या अटी) मध्ये एकूण ६ अटी नमूद करण्यात आल्या आहेत त्यापैकी अट क्र.२ आणि ६ वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित क्र.१ तसेच क्र.३ ते ५ या अटींमध्ये कोणताही बदल नाही."

सर्व विभाग/कार्यालये यांनी संदर्भाधीन क्रमांक-२ येथील दि.६ ऑगस्ट,२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ (क) चे संदर्भात वरील सुधारणेनुसार कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

प्रकाश लाखडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**सर्व संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत.**
**विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील**
**रिक्त पदे भरण्यास प्राध्यान्य देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२००७/प्र.क्र.९४/०७/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३ जुलै, २००७.

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०७३/एचआर-२४/डी-२, दि.३.१०.१९७३.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०८०/११७/एम/१२, दि.५.१२.१९८०,
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०८७/२००/प्र.क्र.३/८७/१२, दि.८.१०.१९९०,
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/१२, दि.६.८.२००२,
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००६/प्र.क्र.१७१/०६/१२, दि. १७.२.२००७.

## शासन परिपत्रक

संदर्भाधिन दिनांक ३/१०/१९७३, ५/१२/१९८० व ८/१०/१९९० च्या आदेशान्वये पदे भरण्याबाबत दिलेले आदेश विचारात घेवून रिक्त पदे विहित कार्यपद्धतीने तातडीने भरण्याबाबत उचित कार्यवाहीचे निदेश संदर्भाधिन दि.१७/२/२००७ च्या आदेशान्वये देण्यात आले आहेत. मंत्रिमंडळाच्या दि.१०/१/२००७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार वरीलप्रमाणे निदेश देण्यात आले आहेत. तथापि याप्रमाणे निदेश देवूनही शासन सेवेतील विशेषतः विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील पदे मोठया प्रमाणावर रिक्त असल्याने मंत्रिमंडळाच्या दि.११/७/२००७ च्या बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. पदे भरण्याच्या अनुषंगाने विविध निदेश संदर्भाधिन दि.१७/२/२००७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत. परंतु त्याप्रमाणे प्रशासकीय विभागांकडून व क्षेत्रीय कार्यालयातील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्याकडून वेळीच कार्यवाही होत नाही. परिणामी शासन सेवेतील पदे रिक्त राहतात व शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने पार पाडता येत नाही. यामुळे विदर्भातील जनतेसाठी शासनाने लागू केलेल्या योजनांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करता आलेली नाही. याबाबत सर्वंकष विचार शासन पुढीलप्रमाणे निदेश देत आहे :-

(१) सर्व संवर्गात पदोन्नती कोटयातील रिक्त असलेली सर्व पदे विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन व मा.उच्च न्यायालयाचे निदेश विचारात घेऊन तातडीने भरावीत. विशेषतः कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यकारी पदे सर्वोच्च प्राध्यान्य देऊन भरावीत.

(२) सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे अपंगांच्या अनुशेषासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे आदेश लक्षात घेऊन भरावीत.

(३) विदर्भातील रिक्त पदांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील सर्व रिक्त पदे शिघ्रातीशीघ्र कोणत्याही परिस्थितीत दि.३१/७/२००७ पर्यंत भरावीत. यासंदर्भात आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतच्या शासन निर्णय,

क्रमांक-टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/१२, दि.६/८/२००२ कडे सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी तंतोतंत पालन करावे. त्याचप्रमाणे विदर्भातील मोठ्या प्रमाणातील रिक्त पदांचे प्रमाण लक्षात घेता राजपत्रित संवर्गातील रिक्त पदे अन्य महसूल विभागातून बदलीने भरण्याची कार्यवाही तातडीने करावी.

(४) नियतकालीक बदल्यांमध्ये ज्या अधिकाऱ्यांच्या बदल्या विदर्भातील कार्यालयात केल्या आहेत. परंतु ते अद्याप बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत. अशा अधिकाऱ्यांना तात्काळ बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याच्या सूचना द्याव्यात आणि ते तेथे रुजू होत नसल्यास या विभागाच्या दि.६/८/२००२ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करण्यात यावी.

२. वरील आदेशांचे पालन करुन रिक्त पदे दि.३१/७/२००७ पर्यंत भरण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांची, विभागीय आयुक्तांची व सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांची राहील.

३. वरील आदेशानुसार विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे दि.३१/७/२००७ पर्यंत न भरल्यास संबंधित प्रशासकीय विभागाने / विभागाच्या सचिवांनी, तसेच क्षेत्रीय कार्यालयातील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी शासन आदेशाचे पालन केले नसल्याची बाब नाईलाजास्तव मंत्रिमंडळाच्या निदर्शनास उचित कार्यवाहीसाठी आणण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व रिक्त पदे भरण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सतीश त्रिपाठी
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

**सर्व संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२००७/प्र.क्र.१९९/०७/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७.११.२००७.

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०७३/एचआर-२४/डी-२, दि.३.१०.१९७३,
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०८०/११७/एम/१२, दि.५.१२.१९८०,
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०८७/२००/प्र.क्र.३/८७/१२, दि.८.१०.१९९०,
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००६/प्र.क्र.१७१/०६/१२, दि. १७.२.२००७.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००६/प्र.क्र.९४/०६/१२, दि.१३.७.२००७.
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००७/प्र.क्र.१२९/०७/१२, दि.२७.८.२००७.
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००७/प्र.क्र. १५९/०७/१२, दि.१.१०.२००७.

**शासन निर्णय**

शासन सेवेतील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबतच्या विविध सूचना या विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णय व परिपत्रकान्वये वेळोवेळी सर्व विभागांना/कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे भरण्यास प्राधान्य देण्याबाबतच्या सूचना संदर्भाधिन क्र.५ येथील दि.१३.७.२००७ च्या आदेशान्वये सर्व विभागांना व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. तसेच रिक्त पदे भरण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम संदर्भाधीन दि.२७.८.२००७ च्या शासन निर्णयान्वये विहित केला असून सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याचा कालबध्द कार्यक्रम संदर्भाधीन दि.१.१०.२००७ च्या शासन निर्णयान्वये विहित केला आहे. तथापि, अद्यापही रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आवश्यक त्या गतीने होत नसल्याचे निर्दशनास आले. याअनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचे सादरीकरण दि.३१.१०.२००७ च्या मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आले. सदर मंत्रिमंडळ बैठकीत या सादरीकरणावर मंत्रिमंडळात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने जे निर्णय घेण्यात आले, त्यामधील सेवा उपविभागाशी संबंधित निर्णय विचारात घेऊन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**शासन निर्णय** :-

१) पदोन्नतीच्या कोटयातील (वि.जा.भ.ज. व वि.मा.प्र.तील पदे वगळून उर्वरित) सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करावी.

२). गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सहा महिन्यात पूर्ण करावी.

३) प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील ज्या क्षेत्रीय कार्यालयांचा आकृतीबंध अद्याप मंजूर झालेला नाही त्या संबंधित प्रशासकिय विभागांनी क्षेत्रीय कार्यालयांचा आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करावी.

२. वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करुन विहित कार्यपद्धतीने रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांनी तातडीने कार्यवाही करावी. पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली पदे ३ महिन्यांच्या आत भरली गेली नाही तर संबंधित विभागांच्या सचिवांवर जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात येईल याची सर्व विभागांनी नोंद घ्यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७११९७१७२७०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**सतीश त्रिपाठी**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.**

**गडचिरोली जिल्ह्यातील सर्व संवर्गातील रिक्त पदे सर्वोच्च प्राधान्य देऊन तातडीने भरण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२००९/प्र.क्र.२५१/०९/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८ डिसेंबर, २००९

वाचा : १) शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२००७/प्र.क्र.९४/०७/१२, दि. १३.७.२००७.
२) शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२००७/प्र.क्र.१९१/०७/१२, दि. १७.११.२००७.

**शासन परिपत्रक**

शासन सेवेतील सर्व संवर्गातील रिक्त पदे तातडीने व विहित कार्यपध्दतीने भरण्याबाबतचे निदेश सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन दि.१७.११.२००७ च्या शासन निर्णयान्वये दिले आहेत. तसेच विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे भरण्यास प्राधान्य देण्यासंदर्भात सविस्तर निदेश संदर्भाधीन दि.१३.७.२००७ च्या शासन परिपत्रकान्वये दिले आहेत. विदर्भातील रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील सर्व रिक्त पदे शिघ्रातीशिघ्र कोणत्याही परिस्थितीत दि.३१/७/२००७ पर्यंत भरण्याचे दि.१३.७.२००७ च्या परिपत्रकान्वये स्पष्ट केले आहे. तथापि याप्रमाणे निदेश देऊनही नक्षलग्रस्त भागातील विशेषत: गडचिरोली जिल्ह्यातील पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याचे दिसून आले आहे. नक्षलग्रस्त भागातील विशेषत: गडचिरोली जिल्ह्यातील पदे भरण्याबाबत प्रशासकीय विभाग, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्याकडून कार्यवाही झाली नसल्याने नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी शासनाने लागू केलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने होऊ शकत नाही. यामुळे सदर भागातील जनतेसाठी शासनाने लागू केलेल्या योजनांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करता आलेली नाही. याबाबत सर्वंकष विचार करुन शासन पुढीलप्रमाणे निदेश देत आहे :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील सर्व संवर्गातील रिक्त असलेली सर्व पदे विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन व सर्वोच्च प्राधान्य देऊन तातडीने कोणत्याही परिस्थितीत दि.३१.१.२०१० पर्यंत भरण्यात यावीत.

(२) गट-अ, ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गातील राज्यस्तरावर / महसूली विभाग स्तरावर बदलीपात्र असलेल्या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या बदल्या, बदल्यांच्या अधिनियमातील तरतूदी लक्षात घेऊन गडचिरोली जिल्ह्यात करुन त्या जिल्ह्यातील सर्व रिक्त पदे भरण्यात यावीत. तसेच गट -ब (अराजपत्रित), गट-क व ड संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील पदोन्नतीसाठीच्या आदेशानुसार व कार्यपध्दतीनुसार तातडीने भरण्यात यावी. त्याचप्रमाणे सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे विहित मार्गाने व विहित कार्यपध्दती कोणत्याही परिस्थितीत दि.३१.१.२०१० पर्यंत पदे भरली जातील यादृष्टीने कार्यवाही करावी.

(३) वरील अ.क्र. २ नुसार बदलीने पदे भरताना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन, अधिनियम, २००५ मधील यथास्थिती कलम ४ (४) (एक) अथवा (दोन) मधील तरतूदीचे पालन करुन उचित स्तरावरुन मान्यता घेऊन बदलीबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच कलम ३ मध्ये विहित केलेला पदावधी पूर्ण झालेला नसेल अशा प्रकरणी कलम ४ (५) मधील तरतूदीनुसार (कलम ६ मध्ये नमूद बदली करण्यास सक्षम लगत वरिष्ठ प्राधिकाऱ्यांची मान्यता घेण्याची) कार्यवाही करण्यात यावी.

(४) वर निदेश दिल्याप्रमाणे राजपत्रित संवर्गातील सर्व रिक्त पदे विहित कालमर्यादेत भरण्याची जबाबदारी सर्व प्रशासकीय विभागांची राहील. तसेच विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांतील सर्व रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही योग्य प्रकारे व विहित कालमर्यादेत होत आहे वा कसे याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी आढावा घेणे आवश्यक राहील.

(५) नियतकालीक बदल्यांमध्ये ज्या अधिकारी/कर्मचा-यांच्या बदल्या गडचिरोली जिल्ह्यातील कार्यालयात केल्या आहेत. परंतु ते अद्याप बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत. अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना तात्काळ बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याच्या सूचना द्याव्यात आणि असे अधिकारी/कर्मचारी तेथे रुजू न झाल्यास तसेच आता रिक्त पदे भरताना बदली करण्यात येणारे अधिकारी/कर्मचारी तेथे तात्काळ रुजू न झाल्यास या विभागाच्या दि.६/८/२००२ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करण्यात यावी.

२. वरील आदेशांचे पालन करुन रिक्त पदे भरण्यासंबंधीच्या कार्यवाहीचा अहवाल दि.२०/१/२०१० पर्यंत प्रधान सचिव (सेवा), सा.प्र.वि. यांना सादर करण्यात यावा. त्यामध्ये पदनाम, गट (अ/ब/क/ड) रिक्त पदांची संख्या, पद कशा पध्दतीने भरले आहे त्यासंबंधीच्या आदेशाचा दिनांक, संबंधित अधिकारी / कर्मचारी रुजू झाल्याचा दिनांक याबाबतचा पदनिहाय तपशील उपलब्ध करण्यात यावा.

३. वरील आदेशानुसार गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे दि.३१/१/२०१० पर्यंत न भरल्यास संबंधित प्रशासकीय विभागाने / विभागाच्या सचिवांनी, तसेच क्षेत्रीय कार्यालयातील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी शासन आदेशाचे पालन केले नसल्याची बाब नाईलाजास्तव मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास उचित कार्यवाहीसाठी आणण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व रिक्त पदे भरण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९१२१८१८२२४८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के.पी.बक्षी.
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

**गोंदीया जिल्हयातील सर्व संवर्गातील रिक्त पदे विहित कार्यपध्दतीने व तातडीने भरण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
एसआरव्ही-२००९/प्र.क्र.२५१/०९/१२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - १८ डिसेंबर, २००९

वाचा :- शा.प.,सा.प्र.वि., क्र.एसआरव्ही-२००७/प्र.क्र.९४/०७/१२,दि.१३.७.२००७

**शासन परिपत्रक**

गडचिरोली व अन्य नक्षलग्रस्त भागातील विकास कामांना गती देण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी दि.१८.६.२००९ रोजी बैठक घेतली होती. सदर बैठकीत "गोंदीया जिल्हयातील रिक्त असलेली पदे निश्चित कालमर्यादा आखून भरण्यात यावीत." असा निर्णय झाला आहे. बैठकीचे कार्यवृत्त दि.१५.१२.२००९ रोजी प्राप्त करुन घेण्यात आले आहे. या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा मा.मुख्यमंत्री यांनी विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयात दि.१६.१२.२००९ रोजीच्या बैठकीत घेतला. उपरोक्त नमूद दि.१८.६.२००९ च्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

(१) गोंदीया जिल्हयातील सर्व संवर्गातील रिक्त असलेली सर्व पदे विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन व तातडीने कोणत्याही परिस्थितीत दि.३१.३.२०१० पर्यंत भरण्यात यावीत.

(२) गट-अ, ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गातील राज्यस्तरावर / महसूली विभाग स्तरावर बदलीपात्र असलेल्या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या बदल्या, बदलीच्या अधिनियमातील तरतूदी लक्षात घेऊन गोंदीया जिल्हयात करुन त्या जिल्हयातील सर्व रिक्त पदे भरण्यात यावीत. तसेच गट -ब (अराजपत्रित), गट-क व ड संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील पदोन्नतीसाठीच्या आदेशानुसार व कार्यपध्दतीनुसार तातडीने भरण्यात यावी. त्याचप्रमाणे सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे विहित मार्गाने व विहित कार्यपध्दती कोणत्याही परिस्थितीत दि.३१.३.२०१० पर्यंत पदे भरली जातील यादृष्टीने कार्यवाही करावी.

३) वरील अ.क्र. २ नुसार बदलीने पदे भरताना महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन, अधिनियम, २००५ मधील यथास्थिती कलम ४ (४) (एक) अथवा (दोन) मधील तरतूदीचे पालन करुन उचित स्तरावरुन मान्यता घेऊन बदलीबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच कलम ३ मध्ये विहित केलेला पदावधी पूर्ण झालेला नसेल अशा प्रकरणी कलम ४ (५) मधील तरतूदीनुसार (कलम ६ मध्ये नमूद बदली करण्यास सक्षम लगत वरिष्ठ प्राधिका-यांची मान्यता घेण्याची) कार्यवाही करण्यात यावी.

(४) वर निदेश दिल्याप्रमाणे राजपत्रित संवर्गातील सर्व रिक्त पदे विहित कालमर्यादेत भरण्याची जबाबदारी सर्व प्रशासकीय विभागांची राहील. विभागाच्या अधिपत्याखालील गोंदीया जिल्हयातील क्षेत्रिय कार्यालयांतील सर्व रिक्त पदे भरण्याबाबत योग्य प्रकारे व विहित कालमर्यादेत कार्यवाही होत आहे वा कसे याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी आढावा घ्यावा.

(५) नियतकालीक बदल्यांमध्ये ज्या अधिकारी/कर्मचा-यांच्या बदल्या गोंदीया जिल्हयातील कार्यालयात केल्या आहेत. परंतु ते अद्याप बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत. अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना तात्काळ बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याच्या सूचना द्याव्यात आणि असे अधिकारी/कर्मचारी तेथे रुजू न झाल्यास तसेच आता रिक्त पदे भरताना बदली करण्यात येणारे अधिकारी/कर्मचारी तेथे तात्काळ रुजू न झाल्यास या विभागाच्या दि.६/८/२००२ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करण्यात यावी.

२. विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे भरण्यास प्राधान्य देण्याबाबत संदर्भाधीन दि.१३.७.२००७ च्या परिपत्रकान्वये दिलेले आदेश व मा.मुख्यमंत्री महोदयांनी घेतलेल्या बैठकीतील निर्णय विचारात घेऊन वरील निदेशानुसार कृपया तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

(श्री.प्र.पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे भरण्याच्या कार्यवाहीसंदर्भात.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.६८/१०/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २०.३.२०१०

वाचा : १) शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२००७/प्र.क्र.९४/०७/१२, दि.१३.७.२००७.
२) शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२००९/प्र.क्र.२५१/०९/१२, दि.१८.१२.२००९.

**शासन परिपत्रक**

विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे भरण्यास प्राध्यान्य देण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १३.७.२००९ च्या परिपत्रकान्वये निदेश दिले आहेत. तसेच गडचिरोली जिल्हातील सर्व संवर्गातील रिक्त पदे सर्वोच्च प्राधान्य देऊन तातडीने भरण्याबाबत व गोंदिया जिल्हयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत संदर्भाधीन अ.क्र.२ येथील दिनांक १८.१२.२००९ च्या परिपत्रकान्वये निदेश दिले आहेत. यानुसार गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे भरण्याबाबतच्या कार्यवाहीचा आढावा मा.मुख्यमंत्री महोदयांकडून वेळोवेळी घेण्यात येत आहे. याअनुषंगाने दि.१७.३.२०१० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत काही मंत्री महोदयांनी असे निदर्शनास आणले की, गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे बदलीने भरताना विदर्भातीलच इतर जिल्ह्यातून बदलीने पदे भरण्यात येत आहेत. त्यामुळे गोंदिया, चंद्रपूरसारख्या विदर्भातीलच इतर जिल्ह्यात रिक्त पदांच्या समस्या उद्भवत आहेत. या परिस्थितीत गडचिरोली जिल्ह्यातील पदे बदलीने भरताना विदर्भातील जिल्ह्यातून विशेषतः गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यातून बदल्या न करता विदर्भाबाहेरील जिल्ह्यातून अधिका-यांची / कर्मचा-यांची बदली करुन ही पदे तातडीने भरण्याचे निदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. याअनुषंगाने पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

१) गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे बदलीने भरताना, राज्यस्तरावर बदलीपात्र पदांच्या बाबतीत विदर्भाबाहेरील (नागपूर व अमरावती महसूली विभागाबाहेरील) जिल्ह्यातून बदलीने भरण्यात यावीत व महसूली विभाग स्तरावर बदलीपात्र पदांच्या बाबतीत गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्याव्यतिरिक्त अन्य जिल्ह्यातून बदलीने भरण्यात यावीत.

२) गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदांप्रमाणेच गोंदिया जिल्ह्यातील रिक्त पदे बदलीने भरताना, राज्यस्तरावर बदलीपात्र पदांच्या बाबतीत विदर्भाबाहेरील (नागपूर व अमरावती महसूली विभागाबाहेरील) जिल्ह्यातून बदलीने भरण्यात यावीत व महसूली विभाग स्तरावर बदलीपात्र पदांच्या बाबतीत गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्याव्यतिरिक्त अन्य जिल्ह्यातून बदलीने भरण्यात यावीत.

३) गडचिरोली तसेच गोंदिया जिल्ह्यातील पदावर बदली केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना संबंधित अधिका-यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे. बदलीचे आदेश निघूनही संबंधित अधिकारी कार्यमुक्त करीत नसल्यास अथवा संबंधित अधिका-यांनी कार्यमुक्त केल्यानंतर बदली केलेले अधिकारी / कर्मचारी बदलीच्या पदावर रुजू झाले / होत नसल्यास ही बाब सक्षम प्राधिका-यांनी त्यांचेविरुध्द शा.नि., सा.प्र.वि., दि.६.८.२००२ नुसार उचित कारवाई करावी. गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे भरण्याच्या कार्यवाहीसंदर्भात घेण्यात येणा-या आढाव्यामध्ये ही बाब निदर्शनास आणण्यात यावी.

४) वरीलप्रमाणे बदल्या करताना बदलीच्या अधिनियमातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच सर्वसाधारण बदल्या करताना प्राधान्याने या जिल्ह्यांमधील रिक्त पदे भरण्यात यावीत.

५) वरील निदेशांचे काटेकोरपणे पालन कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागप्रमुख / विभागप्रमुख यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

के.पी.बक्षी.
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

**गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे सर्वोच्च प्राधान्याने तात्काळ भरण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२७९/२०१०/१२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ ऑक्टोबर २०१०

वाचा : १) शासन निर्णय, सा.प्र.वि.,क्रमांक : टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा, दिनांक ६ ऑगस्ट,२००२.
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.,क्रमांक : एसआरव्ही-२००७/प्र.क्र.९४/०७/१२, दिनांक १३ जुलै,२००७.
३) शासन निर्णय, सा.प्र.वि.,क्रमांक : एसआरव्ही-२००७/प्र.क्र.१९९/०७/१२, दिनांक १७ नोव्हेंबर, २००७.
४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.,क्रमांक : एसआरव्ही-२००९/प्र.क्र.२५१/०९/१२, दिनांक १८ डिसेंबर, २००९.
५) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.,क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.६८/१०/१२, दिनांक २० मार्च, २०१०.

**शासन निर्णय**

संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये आदिवासी/नक्षलग्रस्त भागांसाठी विशेष कृती कार्यक्रम आखण्यात आला असून आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार त्या भागात नेमणूक झाल्यानंतर त्या ठिकाणी रुजू न होणाऱ्या / बदली रद्द करण्याचा प्रयत्न करणाऱ्या किंवा रजेवर जाणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करण्यात यावी असे निदेश दिले आहेत. तसेच संदर्भाधीन अनुक्रमांक २,३,४,५ येथील आदेशान्वये विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील विशेषत: गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत. तथापि, गडचिरोली जिल्हयातील सर्व संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत **वारंवार निदेश देऊनही त्याचे पालन करण्यात येत नाही,** तसेच गडचिरोली जिल्हयात बदलीने नियुक्ती केल्यानंतर असे अधिकारी त्या जिल्हयात रुजू होत नाहीत. त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील विकास कामावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. शासनाने याची गंभीर दखल घेतली असून पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येत आहेत :-

१) शासन सेवेतील जे अधिकारी / कर्मचारी गडचिरोली जिल्हयात पदोन्नतीने / बदलीने किंवा अन्यथा नेमणुक होऊनही नेमणूक आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसात आपल्या नवीन नियुक्तीच्या पदावर रुजू झालेले नाहीत त्यांना म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम ४ नुसार कार्यवाही करुन तात्काळ निलंबित करण्यात यावे. ही कार्यवाही त्वरित करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांची राहील.

२) अशा अधिकारी / कर्मचारी यांना निलंबित करण्याचे आदेश नियुक्ती प्राधिकाऱ्यापेक्षा निम्न दर्जाच्या अधिकाऱ्यांनी काढले तर अशा प्रकरणी म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम ४ (क) च्या

नरनुकानुसार अशा प्राधिकरणाने ज्या परिस्थितीत प्रस्तुत आदेश काढला असेल ती परिस्थिती संबंधित प्राधिकरणाने तात्काळ नियुक्ती प्राधिकाऱ्याला कळवावी.

३) गडचिरोली जिल्हयात विविध विभागांतर्गत अद्यापही रिक्त असलेली पदे त्वरित भरण्याची कार्यवाही विभागाने तातडीने पूर्ण करावी. त्यासाठी प्रशासकीय विभागाने त्यांच्या विभागाच्या अधिपत्याखालील गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे भरण्यासाठी राज्याच्या प्रत्येक महसूली विभागातील चांगल्या अधिकाऱ्यांच्या बदलीने/पदोन्नतीने नेमणुका कराव्यात. याप्रमाणे नेमणुक करतांना बदलीच्या अधिनियमातील तरतुदींचे पालन करण्यात यावे. यानुसार बदलीने नियुक्त केलेले अधिकारी बदलीच्या आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांत गडचिरोली जिल्हयातील पदावर रुजू न झाल्यास त्यांच्याबाबतीत वरील अनुक्रमांक (१) नुसार कारवाई करण्यात यावी.

२. वरील निदेशानुसार सर्व प्रशासकीय विभागांनी तातडीने कार्यवाही करावी. याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा आढावा सामान्य प्रशासन विभागाकडून घेण्यात येऊन त्याबाबत मा.मुख्य सचिव व मा.मुख्यमंत्री यांना अवगत करण्यात येणार आहे. सबब सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी या आदेशानुसार तात्काळ केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रधान सचिव (सेवा) यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१०१०८१६२५३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( के.पी.बक्षी )
प्रधान सचिव (सेवा)

**गडचिरोली जिल्हयातील शासकीय कार्यालयातील गट "क" व गट 'ड' संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२००९/प्र.क्र.२५३/०९/१२,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- २.२.२०११**

वाचा : १)शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-१००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दि.१९.११.२००३.
२)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र: एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१२/०४/बारा, दि. ७.६.२००४.
३)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र : प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि. १९.१०.२००७.
४ शासन निर्णय, वित्त विभाग क्र :असंक-१०१०/प्र.क्र.१/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दि.५.६.२०१०.

**शासन निर्णय**

शासकीय/निमशासकीय कार्यालये, महामंडळे, सहकारी संस्था, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम इत्यादींच्या अधिपत्याखालील कार्यालयातील रिक्त पदे भरताना (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येणारी पदे वगळून) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालयाकडून) ज्येष्ठतेनुसार यादी प्राप्त करुन घ्यावी तसेच रिक्त पदांची जाहिरात सर्व प्रसारमाध्यमाव्दारे देऊन अर्ज मागविण्यात यावे. याप्रमाणे प्राप्त होणा-या यादी व अर्जांमधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी असे आदेश संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. गट "ड" मधील रिक्त पदे नामनिर्देशनाने भरताना अनुसरण्याची कार्यपध्दती संदर्भाधीन अ.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये विहित केली आहे. तसेच राज्य शास.नाच्या दुय्यम सेवांमध्ये (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येणारी पदे वगळून) गट "क" मधील पदांवर निवडीची कार्यपध्दती संदर्भाधीन अ.क्र.३ येथील शासन निर्णयान्वये विहित केली असून त्याअनुषंगाने वेळोवेळी सुधारित आदेश देण्यात आले आहेत.

२. शासकीय कार्यालयातील गट "क" मधील (लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळून) व गट "ड" मधील पदे भरताना वर नमूद शासन परिपत्रक/निर्णयातील आदेशानुसार कार्यवाही करावयाची आहे. तथापि गडचिरोली संपूर्ण जिल्हा नक्षलग्रस्त म्हणून घोषित केला असून तेथील भौगोलिक व सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील गट-क व गट ड मधील पदांवर नियुक्तीसाठी स्थानिकांना प्राधान्य देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांतील गट-क व गट ड मधील पदांवर नियुक्तीसाठी स्थानिकांना प्राधान्य मिळाल्यास तेथील बेरोजगारी कमी होऊन जनतेच्या विकासास हातभार लागेल. तसेच पदे रिक्त राहण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील गट "क" व "ड" मधील सरळसेवेची पदे भरताना स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदी व सेवाविषयक अन्य आदेश यांबरोबर खालील अटी नियुक्तीसाठी विहित करण्यात याव्यात :-

१) गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी तसेच स्थानिक आदिवासी भागात बोलली जाणारी बोली भाषा (Local Tribal dialect) अवगत असणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच शासन निर्णय,

सामान्य प्रशासन विभाग, दि.११.५.१९९६, १९.३.१९९८ व १०.६.२००८ अन्वये तरतूद केलेल्या पसंतीक्रमाच्या अगोदरचा प्रथम पसंतीक्रम देण्यात येईल.

२) संबंधित कर्मचारी गडचिरोली जिल्ह्याच्या बाहेर बदलीस पात्र ठरणार नाहीत.

३) गडचिरोली जिल्ह्यातील पदभरतीसाठी स्पर्धा परीक्षा घेताना परीक्षेसाठी विहित अभ्यासक्रमामध्ये (त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेनुसार त्या स्तरावरील) स्थानिक भागाच्या भौगोलिक व अन्य माहितीचा जास्त प्रमाणात समावेश असावा.

४) गट "क" व गट "ड" मधील पदांवर नियुक्तीसाठीच्या अन्य अटी व शर्ती कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०२०२१९२४२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के.पी.बक्षी
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

आदीवासी / नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.६.८.२००२ मधील आदेशानुसार तातडीने कार्यवाही करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक:एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.३७२/१२,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १०.१२.२०१२.

वाचा (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टीआरएफ-२०००/ प्र.क्र. ३/१२, दि.६.८.२००२.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००७/प्र.क्र.९४/०७//१२, दि.१३.७.२००७.
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००९/प्र.क्र.२५१/०९/१२, दि.१८.१२.२००९.
(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.६८/१०/१२, दि.२०.३.२०१०.
(५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२७९/२०१०/१२, दि.२८.१०.२०१०.

प्रस्तावना :-

राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये दिल्या आहेत. त्यानुसार अखिल भारतीय सेवेतील, भारतीय प्रशासन सेवा भारतीय पोलिस सेवा व भारतीय वन सेवांमधील कनिष्ठ वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांची, त्यांच्या सेवेतील पहिली नियुक्ती आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात पदांच्या उपलब्धतेनुसार करावी, त्यांना कनिष्ठ वेतनश्रेणीतून वरिष्ठ वेतनश्रेणीत पदोन्नती देताना या भागात किमान तीन वर्षे नेमण्यात यावे. सेवेत पदोन्नतीनंतरची पहिली नेमणूक पदांच्या उपलब्धतेनुसार नक्षलग्रस्त भागात करावी असे निदेश दिले आहेत. राज्य सेवेतील अधिकाऱ्यांच्या बाबतही या सूचना लागू केलेल्या आहेत. तसेच वयाची ५० वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची शक्यतो या भागात नियुक्ती करण्यात येऊ नये असे निदेश दिले असून याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांची, विहित कालावधी पूर्ण होण्यापुर्वी (विभागीय चौकशी वगळता) कोणत्याही कारणास्तव बदली करण्यात येऊ नये असेही स्पष्ट केले आहे. या भागात नेमणूक झाल्यानंतर त्या ठिकाणी रुजू न होणाऱ्या / बदली रद्द करण्याचा प्रयत्न करणाऱ्या किंवा रजेवर जाणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कठोर कार्यवाही करण्यात यावी तसेच या भागातील पदे रिकामी ठेवू नयेत, इतरत्र पदे रिक्त ठेवून या भागात अधिकाऱ्यांच्या नेमणूका कराव्यात असे स्पष्ट निदेश दिले आहेत.

वरील मार्गदर्शक सूचना व निदेशांनुसार प्रशासकीय विभागांकडून आवश्यक कार्यवाही होत नसून नक्षलग्रस्त भागातील पदे रिक्त राहत असल्याचे निदर्शनास आल्याने, विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील रिक्त पदे प्राधान्याने भरण्याचे निदेश संदर्भाधीन क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आले. गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात संदर्भाधीन क्र. ३ व ४ येथील शासन परिपत्रकान्वये निदेश दिले आहेत. तसेच गडचिरोली जिल्हयात पदोन्नतीने / बदलीने किंवा अन्यथा नेमणूकीनंतर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसात रुजू न होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना म.ना.से. (शि.वअ.) नियम, १९७९ नुसार कार्यवाही करुन तात्काळ निलंबित करण्याचे निदेश संदर्भाधीन क्र. ५ येथील शासन परिपत्रकान्वये दिले आहेत.

मा.उच्च न्यायालयातील सु मोटो रिट पिटीशन क्र.३२७८/२०१० (श्रीमती पुर्णिमा उपाध्याय वि. अपर मुख्य सचिव, आरोग्य) या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.१३.९.२०१२ रोजीच्या सुनावणीत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.६.८.२००२ अन्वये आदिवासी / नक्षलग्रस्त भागात अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच या भागातील पदे रिक्त न ठेवण्याचे आदेश निदर्शनास आणून त्यानुसार त्या भागातील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निदेश दिले आहेत. या रिट पिटीशनमध्ये अन्य मुद्यांबाबत दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही तसेच रिट पिटीशनमध्ये नमूद केलेली रिक्त पदे शा.नि., दि.६.८.२००२ मधील आदेशानुसार तातडीने भरण्याची कार्यवाही, याचे समन्वयन मुख्य सचिवांनी करण्याचे मा.न्यायालयाने सूचित केले आहे.

परिपत्रक:-

याअनुषंगाने असे निदेश देण्यात येत आहेत की, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.६.८.२००२ मधील आदेश विचारात घेऊन, **प्रशासकीय विभागांनी, आदिवासी / नक्षलग्रस्त भागातील गट अ व गट ब (राजपत्रित) संवर्गातील पदे आदिवासी / नक्षलग्रस्त भागाबाहेरील पदांवर कार्यरत अधिकाऱ्यांच्या बदलीने तातडीने भरण्याची कार्यवाही सर्वोच्च प्राधान्य देऊन करावी. तसेच विभागप्रमुखांनी गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील पदेदेखील आदिवासी / नक्षलग्रस्त भागाबाहेरील पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदलीने तातडीने भरण्याची कार्यवाही करावी.**

मात्र महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर पदोन्नतीने / सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली, २०१० मधील तरतुदीनुसार पदोन्नतीनंतर / सरळसेवेने नियुक्तीनंतर विभागीय संवर्ग वाटप केलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत त्याच विभागीय संवर्गातील आदिवासी / नक्षलग्रस्त भागातील पदावर बदली करता येईल. या भागातील पदे बदलीने पदे भरताना, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार, यथास्थिती मा.मंत्री व मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेऊन उचित कार्यवाही करणे आवश्यक राहील. विभागाने, आवश्यक तर त्यासंबंधीच्या प्रस्तावात मा.उच्च न्यायालयाच्या निदेशाबाबत संबंधितांना अवगत करावे. शासन निर्णय, दि.६.८.२००२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वयाची ५०

वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची शक्यतो या भागात नियुक्ती करण्यात येऊ नये. तसेच नजीकच्या कालावधीत सेवानिवृत्त / स्वेच्छानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना या भागात नियुक्ती देण्यात येऊ नये. या भागात कार्यरत अधिकाऱ्यांची, या भागाबाहेर बदली करावयाची झाल्यास, सदर पदावर, अन्य अधिकाऱ्याची बदली करावी व असा अधिकारी या पदावर रुजू झाल्याशिवाय अगोदर कार्यरत अधिकाऱ्यास कार्यमुक्त करण्यात येऊ नये. गडचिरोली जिल्हयातील पदावर पदोन्नतीने / बदलीने किंवा अन्यथा नेमणूकीनंतर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसात रुजू न होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईबाबत संदर्भाधीन क्र. ५ येथील शासन परिपत्रकान्वये दिलेले निदेश कायम राहतील.

२. मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या सु-मोटो रिट पिटीशनमध्ये मेळघाट, चिखलदरा व धारणी येथील रिक्त पदे तातडीने २ आठवडयात भरण्याचे निदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत. तरी या तालूक्यातील गट अ व गट ब (राजपत्रित) मधील रिक्त पदे भरण्यास सर्वोच्च प्राधान्य देऊन, संबंधित अधिकारी तेथे रुजू होतील याबाबत प्रशासकीय विभागांनी खात्री करुन, आवश्यक कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दि.७.१२.२०१२ पुर्वी पूर्ण करावी. या तालूक्यांव्यतिरिक्तच्या आदीवासी / नक्षलग्रस्त भागातील गट अ व गट ब (राजपत्रित) मधील रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही प्रशासकीय विभागांनी आणि गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील पदे तातडीने भरण्याची कार्यवाही विभागप्रमुखांनी करुन कोणत्याही परिस्थितीत या भागातील रिक्त पदे दि.३१.१२.२०१२ पर्यंत भरली जातील याची दक्षता घ्यावी.

३. वरील आदेशानुसार सर्व प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील आदिवासी भागातील रिक्त पदे भरण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीचे समन्वयन आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येईल. याकरिता सर्व प्रशासकीय विभागांनी, विभागप्रमुखांकडून आवश्यक माहिती प्राप्त करुन, या भागातील, गट अ ते गट ड मधील संवर्गनिहाय मंजूर पदे, प्रत्यक्ष कार्यरत पदे व रिक्त पदे याची माहिती आदिवासी विकास विभागास उपलब्ध करावी. विभागप्रमुखांनी त्यांचेकडे उपलब्ध माहिती, संबंधित प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास यांना उपलब्ध करुन द्यावी.

४. सर्व प्रशासकीय विभागांनी वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे. प्रशासकीय विभागांनी यानुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही न केल्यास, त्यास प्रशासकीय विभागाचे सचिव जबाबदार राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध केले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१२१२१२१२१२१६६६०७ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जयंतकुमार बांथिया)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

# आगाऊ वेतनवाढ

भाग ३५

**ऑक्टोबर,२००६,२००७ व २००८ या वर्षाच्या आगाऊ वेतनवाढी मंजूर केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची सुधारित वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**परिपत्रक क्र.आवेवा-१००९/प्र.क्र.८७/०९/आठ,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दि. ३.७.२००९**

**वाचा :- शा.प.क्र.आवेवा-२००६/प्र.क्र.२०८/०६/आठ, दि.१४.१२.२००६**

**परिपत्रक :-**

शासन सेवेत असताना अतिउत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी विचारात घेऊन दोन अथवा एक आगाऊ वेतनवाढी देण्याची योजना सद्य:स्थितीत अस्तित्वात आहे. सहाव्या आयोगाच्या शिफारशीनुसार दि.१.१.२००६ पासून शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्यात आली असून वेतनसुधारणा समितीच्या शिफारशीनुसार एक अथवा दोन आगाऊ वेतनवाढ देण्याची प्रचलित योजना बंद करून त्याऐवजी अतिरिक्त एक टक्का उच्च दराने वेतनवाढ संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. याप्रकरणी शासनाचे अंतिम आदेश प्राप्त होण्यासाठी काहीसा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सहाव्या वेतन आयोगाने शिफारस केलेली सुधारित वेतनश्रेणी दि.१.१.२००६ पासून लागू करण्यात आली असली तरी देखील दि. १ ऑक्टोबर, २००६, १ ऑक्टोबर, २००७ व १ ऑक्टोबर, २००८ रोजी देय होणाऱ्या आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याची कार्यवाही काही विभागांनी/कार्यालयांनी यापूर्वीच केली आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती सुधारित वेतनश्रेणीत कशी करावी व मंजूर केलेल्या आगाऊ वेतनवाढी त्यामध्ये कशा समाविष्ट कराव्या याबाबत विविध कार्यालयांकडून मौखिक रित्या व नस्तीसंदर्भात करून विचारणा केली जात आहे. यासर्व बाबी विचारात घेऊन सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत

की, दि. १ ऑक्टोबर, २००६, १ ऑक्टोबर, २००७ व १ ऑक्टोबर, २००८ रोजी देय होणाऱ्या आगाऊ वेतनवाढी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आल्या असतील अशा कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती तात्पुरत्या स्वरूपात आगाऊ वेतनवाढी शिवाय करण्यात यावी. त्यानंतर आगाऊ वेतनवाढी संदर्भातील शासनाचे अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतर ते विचारात घेऊन वरील कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती पुन्हा सुधारित करण्यात यावी. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी हे परिपत्रक त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सर्व विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९०७०३१५२४०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( श्री. प्र. पाटील )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना
आगाऊ वेतनवाढ मंजूर करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- आवेवा-२००६/प्र.क्र.१०८/०६/आठ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ डिसेंबर, २००६

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०६९/डी, दिनांक २६ जून, १९७०

२) शासन परिपत्रक व निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७२/डी, दिनांक ११ फेब्रुवारी, १९७४

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही -१०७७/सीएन-१२७/७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर, १९७९

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही -१०७८/सीएन-११/७९/आठ, दिनांक ५ डिसेंबर, १९७९

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :एसआरव्ही-१०८०/१३३३/सीएन-११९/आठ, दिनांक २४ सप्टेंबर, १९८०

६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एआरव्ही-१०८१/१२११/सीएन-११०/आठ, दि. ४ ऑगस्ट, १९८१

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :एसआरव्ही-१०८१/१४३३/सीएन-११९/आठ, दिनांक २४ डिसेंबर, १९८१

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :एसआरव्ही-१०८२/५५०/के.नं.९७/आठ, दिनांक ५ एप्रिल,१९८३

९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही -१०८३/ सीएन-१६/आठ, दिनांक ६ सप्टेंबर, १९८३

१०) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८४/के.नं.६/आठ, दि.१९ फेब्रुवारी, १९८४

११) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :एसआरव्ही -१०८५/ २६१७/सीएन-३७८/आठ,दिनांक ७ जानेवारी,१९८६

१२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८५/१६१४/के.नं.२५७/आठ, दिनांक ८ एप्रिल,१९८६

१३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :एसआरव्ही-१०८६/ प्र.क्र.१४१/आठ, दिनांक १४ ऑक्टोबर,१९८८

१४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८६/ प्र.क्र.१४१/आठ, दिनांक ९ मे, १९८९

१५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८९/२८२९/

१६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:आवेवा-१०८९/४४/प्र.क्र.३३/आठ,दिनांक २ जून, १९९०

१७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१०९०/प्र.क्र.१५२/आठ, दिनांक २९ ऑक्टोबर, १९९०

१८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:आवेवा-१०८९/४४/प्र.क्र.३३/आठ, दिनांक ५ नोव्हेंबर, १९९०

१९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:आवेवा-१०९२/प्र.क्र.५९/९२/आठ, दिनांक ५ नोव्हेंबर, १९९२

२०) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१०९३/प्र.क्र.९/आठ, दिनांक २५ फेब्रुवारी, १९९३

२१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :आवेवा-१०९३/प्र.क्र.६/आठ, दिनांक १८ मार्च, १९९३

२२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही -१०९३/प्र.क्र.१३/आठ, दिनांक १७ एप्रिल,१९९३

२३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०९३/१३४०/प्र.क्र.३२/आठ, दिनांक ६ ऑगस्ट, १९९३

२४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१०९३/प्र.क्र.९५/९३/आठ,दिनांक ४ ऑगस्ट, १९९४

२५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :आवेवा-१०९४/प्र.क्र.२५/आठ,दिनांक १६ ऑगस्ट, १९९५

२६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१०९५/प्र.क्र.३९ / आठ,दिनांक ६ सप्टेंबर, १९९५

२७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१०९५/प्र.क्र.१५/आठ,दिनांक १८ एप्रिल, १९९६

२८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१०९६/प्र.क्र.५९/९७/आठ, दिनांक २२ नोव्हेंबर, २०००

**शासन परिपत्रक :-**

प्रशासकीय पुनर्रचना समितीने शिफारस केल्याप्रमाणे शासकीय अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना त्यांनी सेवेत असताना सातत्याने केलेल्या अत्युत्कृष्ट कामाबाबत आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करण्यासंदर्भात योजना प्रथमतः संदर्भाधीन क्र. १ येथील दि. २६ जून, १९७० च्या परिपत्रकान्वये अंमलात आणली. या योजनेसंबंधी तपशीलवार सूचना आणि कार्यपध्दती दि.११ फेब्रुवारी १९७४ च्या आदेशान्वये प्रस्तृत करण्यात आल्या. दरम्यानच्या कालावधीत यासंबंधी विविध सूचना मार्गदर्शक तत्वे/सुधारणा वर नमूद केलेल्या विविध आदेशांन्वये विहित केलेली आहेत. या सर्व सूचना, मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करणे अपेक्षित आहे. तथापि असे निदर्शनास आले आहे की, कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर करतांना प्रशासकीय विभागांकडून आगाऊ वेतनवाढी संबंधात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व आदेश विचारात घेतले जात नाहीत. त्यामुळे प्रस्तावात त्रुटी राहतात आणि त्यांचे निराकरण करुन घेण्यासाठी होणाऱ्या पत्रव्यवहारामुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांना वेतनवाढींचे लाभ मिळण्यास विलंब होतो. प्रस्ताव परिपूर्ण व्हावेत

आणि त्यात त्रुटी राहू नये, शिवाय पत्रव्यवहारामुळे विलंब होऊ नये या उद्देशाने आगाऊ वेतनवाढी मंजुरीबाबत निर्गमित केलेल्या सर्व सूचना/निदेश एकत्र करून त्या सर्वांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक झाले आहे.

१. आगाऊ वेतनवाढी मंजुरीबाबत यापूर्वी शासनाने निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे/सूचना (त्या निर्गमित करणाऱ्या मूळ आदेशांच्या क्रमांक/दिनांकासह) सारांशाने खालीलप्रमाणे आहेत :-

अ) मंत्रालयाबाहेरील गट "क" व गट "ड" मधील कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करण्याचे अधिकार अनुक्रमे विभाग प्रमुखांना / कार्यालय प्रमुखांना पूर्वीप्रमाणेच असतील. आगाऊ वेतनवाढीसाठी मात्र कर्मचाऱ्यांची निवड करताना ती पदोन्नतीसाठी निवड सूची तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशींच्या आधारे करण्यात यावी. (शासन निर्णय दि.४.१२.१९७९ व ५.१२.१९७९)

ब) मंत्रालयातील गट "क" व "ड" मधील कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ /वेतनवाढी मंजूर करण्याचे अधिकार मंत्रालयीन विभागांच्या सचिवांना देण्यात आले आहेत. विभागाने दोन सह/उप सचिव व दोन अवर सचिव (वरिष्ठ सह/उप सचिवास अध्यक्ष म्हणून नेमावे) अशी समिती स्थापन करून आगाऊ वेतनवाढीच्या प्रस्तावांची तपासणी करून शिफारशी विभागाच्या सचिवांना मान्यतेसाठी सादर करावयाच्या आहेत. (शासन निर्णय दिनांक ५.१२.१९७९ व दिनांक ५.४.१९८३)

क) मंत्रालयाबाहेरील गट "ब" मधील अधिकारी ते गट "अ" मधील अवर सचिव दर्जापर्यंतच्या अधिकाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागाच्या सचिवांना पूर्वी प्रमाणेच असतील. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणखालील कार्यालयातील गट "ब" व गट "अ" मधील अवर सचिव पदाच्या समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूरीसाठी विभागातील तीन सह/उप सचिवांची समिती नेमावी. या समितीने आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या प्रस्तावावरील आपल्या शिफारशी विभागांच्या सचिवांना सादर कराव्यात. विभागाच्या सचिवांनी त्यावर अंतिम निर्णय घ्यावा. विभागात उप सचिव किंवा सह सचिव दर्जाचे पुरेसे अधिकारी उपलब्ध नसल्यास अन्य विभागातील उप सचिव / सह सचिव यांना समितीमध्ये सदस्य म्हणून नेमावे. (शासन निर्णय दि.८.४.१९८६)

ड) मंत्रालयीन कक्ष अधिकारी, अवर सचिव, निवडश्रेणी लघुलेखक, वरिष्ठ स्वीय सहायक यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव विभागातील समितीने तपासणी केल्यानंतर विभाग सचिवामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे संबंधितांच्या गोपनीय अहवालाच्या नस्त्यांसह दरवर्षी दिनांक [illegible] ऑगस्ट पर्यंत पाठवावेत. विभागांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव, सामान्य प्रशासन विभागाकडून त्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मध्यवर्ती समितीस अंतिम शिफारशींसाठी सादर करावेत. मध्यवर्ती समितीम[illegible] तीन सह सचिव/ उप सचिव यांचा समावेश [illegible] समिती सदस्यांची संख्या तीन पेक्षा जास्त असू नये. मध्यवर्ती समितीच्या शिफारशींना सचिव/प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (सेवा) यांची मान्यता घेण्यात यावी. मध्यवर्ती समितीस प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दिनांक ३० सप्टेंबर पर्यंत छाननी करून आपल्या शिफारशी [illegible] उपरोक्त मुदतीत सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव प्राप्त न झाल्यास व त्या विभागातील अधिकारी / कर्मचारी आगाऊ वेतनवाढीसाठी विचार होण्यापासून वंचित राहिल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभागाच्या आस्थापना शाखेच्या उप सचिव यांची राहील. (शासन निर्णय दिनांक १८.३.१९९३)

इ) गट 'अ' मधील (पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीमुळे सुधारित झालेल्या वेतनश्रेणीतील) रुपये १६,५००/- या उच्चतम टप्प्यापर्यंतच्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या उर्वरित सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांचे आगाऊ वेतनवाढीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामधील आस्थापना मंडळ क्र. २ तपासेल व आपल्या शिफारशी मुख्य सचिवांना सादर करेल. (शासन निर्णय दि.५.११.१९९०)

२. आगाऊ वेतनवाढी मंजुरीसाठीचे निकष :-

अ) आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करताना शासकीय कर्मचाऱ्याची आगाऊ वेतनवाढीच्या दिनांकास संबंधित पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा झालेली असणे आवश्यक आहे. (शासन निर्णय दिनांक २४.९.१९८०)

ब) (१) दोन आगाऊ वेतनवाढी ज्या वर्षात देण्याचा प्रस्ताव आहे त्या वर्षापूर्वी लगतच्या पाचही वर्षांचे गोपनीय अहवाल "अत्युत्कृष्ट" (अ+) असावेत किंवा पाच पैकी किमान चार वर्षांचे "अत्युत्कृष्ट" (अ+) व उर्वरित एक वर्षाचा "निश्चित चांगला" (ब+) पेक्षा कमी दर्जाचा नसावा. (शासन निर्णय दिनांक२९.१०.१९९०)

(२) एक आगाऊ वेतनवाढ ज्या वर्षात देण्याचा प्रस्ताव आहे त्या वर्षाच्या लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालापैकी किमान तीन वर्षाचे "अत्युत्कृष्ट" (अ+) आणि दोन वर्षाचे "निश्चित चांगला" (ब+) पेक्षा कमी दर्जाचे नसावेत. (शासन निर्णय दिनांक २९.१०.१९९०)

क) गट-ड मधील कर्मचाऱ्यांचे गोपनीय अभिलेख लिहिण्याची पध्दत बंद केली असल्यामुळे गट-ड मधील कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाअभिलेखातील नोंदींच्या आधारे आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात. (शासन निर्णय दिनांक ६.९.१९९५)

३. संवर्गनिहाय आगाऊ वेतनवाढींची मर्यादा :-

अ) आगाऊ वेतनवाढीसाठी संवर्ग निहाय कमालमर्यादा ५ % अशी राहील. दोन आगाऊ वेतनवाढीसाठी संवर्गनिहाय कमालमर्यादा २ % आणि एक आगाऊ वेतनवाढीसाठी ३ % अशी राहील. तथापि, ज्या कार्यालयातील संवर्गसंख्या अगदी छोटी म्हणजे २० पेक्षा कमी म्हणजे १ असली तरी आगाऊ वेतनवाढीसाठी विहित केलेल्या निकषानुसार एका व्यक्तीस आगाऊ वेतनवाढ/ वेतनवाढी मंजूर करण्यास हरकत नसावी. (शासन निर्णय दिनांक ४.१२.१९७९, २४.१२.१९८१)

ब) एका आगाऊ वेतनवाढीसाठी असलेली ३ % व दोन आगाऊ वेतनवाढीसाठी असलेली २% ही कमालमर्यादा अपूर्णांकात येत असेल व हा अपूर्णांक ०.५ पेक्षा अधिक असेल तर ती संख्या एक समजण्यात यावी. (शासन निर्णय दिनांक १८.४.१९९६)

४. आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करण्यासाठी कमालमर्यादा :-

अ) शासकीय कर्मचाऱ्याला पाच वर्षात दोन वेळा आगाऊ वेतनवाढी मंजूर करता येणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी. एकदा आगाऊ वेतनवाढ मंजूर झाल्यानंतर कर्मचारी त्यानंतर ५ वर्षे उलटल्यानंतरच पुन्हा आगाऊ वेतनवाढीसाठी पात्र ठरेल.

उदा. १ ऑक्टोबर, ९२ रोजी आगाऊ वेतनवाढ मंजूर केलेला अधिकारी/ कर्मचारी, त्याचे सन ९२-९३, ९३-९४, ९४-९५, ९५-९६, ९६-९७ या वर्षाचे गोपनीय अभिलेख उपलब्ध झाल्यावर पुन: आगाऊ वेतनवाढीसाठी विचारार्थ पात्र समजण्यात येईल. (शासन निर्णय दिनांक ४.४.१९९०)

ब) ज्या शासकीय अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असेल त्यांची संख्या जर संवर्गनिहाय विहित कमाल ५% या प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि त्यावेळी विचारार्थ सेवकांच्या गोपनीय अभिलेखांची प्रतवारी सारखीच असेल तर तुलनेने अलिकडे ज्या सेवकांना आगाऊ वेतनवाढींचा फायदा मिळालेला नाही, त्यांचा ज्येष्ठतेनुसार आगाऊ वेतनवाढी देण्याकरीता विचार करण्यात यावा. (शासन निर्णय दिनांक ४.१२.१९७९, ५.११.१९९२)

**५. पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याला/अधिकाऱ्याला आगाऊ वेतनवाढ/ वेतनवाढी मंजूर करणे :-**

शासकीय कर्मचाऱ्याला ज्या वर्षाकरीता आगाऊ वेतनवाढी मंजूर करावयाची आहे त्या वर्षात पदोन्नती मिळाल्यास तो शासकीय कर्मचारी आगाऊ वेतनवाढीपासून वंचित राहू नये याकरिता दिनांक ४.१२.१९७९ व दिनांक २४.९.१९८० च्या शासन निर्णयाव्दारे देण्यात आलेले निदेश पुढीलप्रमाणे :-

अ) शासकीय कर्मचाऱ्याला ज्या वर्षाकरीता आगाऊ वेतनवाढ मंजूर करावयाची आहे, त्या वर्षीच्या १ ऑक्टोबर पूर्वीच्या वर्षभरात जर त्याला पदोन्नती मिळाली असेल तर त्या शासकीय कर्मचाऱ्याला त्या वर्षीच्या १ ऑक्टोबर पासून पदोन्नतीपूर्वी धारण केलेल्या पदाच्या वेतनश्रेणीत आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्यास हरकत नसावी. (शासन निर्णय दिनांक २४.९.१९८०)

ब) वर (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे आगाऊ वेतनवाढीचा फायदा देताना त्या शासकीय कर्मचाऱ्याला पदोन्नतीच्या दिनांकास पदोन्नतीपूर्वीच्या पदाच्या वेतनश्रेणीत काल्पनिक वेतनवाढ देण्यात यावी आणि त्या अनुषंगाने पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्यात यावी. वेतननिश्चितीमुळे येणाऱ्या थकबाकीची रक्कम त्यावर्षीच्या १ ऑक्टोबर पासून अदा करण्यात यावी.

क) जो शासकीय कर्मचारी/अधिकारी वेतनश्रेणीच्या अंतिम टप्पालगतपूर्वीच्या टप्प्यावर वेतन घेत आहे अशा कर्मचाऱ्याला/ अधिकाऱ्याला दोन आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या असतील तर त्या शासकीय कर्मचाऱ्याला दोन पैकी एक आगाऊ वेतनवाढीचा फायदा पदोन्नतीच्या दिनांकास काल्पनिक वेतनवाढ देऊन वर (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी. आणि उर्वरित वेतनवाढीचा फायदा वेतनवाढीच्या अंतिम टप्प्याच्या लगतपूर्वीच्या वेतनवाढीच्या २४ पट रक्कमेत देण्यात यावा.

वर नमूद केलेली कार्यपध्दती केवळ ज्या कर्मचाऱ्याला १ ऑक्टोबर पूर्वीच्या (आगाऊ वेतनवाढीच्या दिनांका पूर्वीच्या) वर्षात पदोन्नती मिळालेली आहे अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू होऊ शकते.

ड) अंतिम टप्प्यावर वेतन घेणारे कर्मचारी/ अधिकारी यांना मंजूर करण्यात आलेल्या एका आगाऊ वेतनवाढीचा फायदा त्यांच्या अंतिम टप्प्यालगत, पूर्वीच्या वेतनवाढीच्या २४ पट रक्कम देऊन द्यावा. तसेच दोन वेतनवाढीचा फायदा अंतिम टप्प्यालगत, पूर्वीच्या वेतनवाढीच्या ४८ पट रक्कम देऊन द्यावा (शासन निर्णय दिनांक ४.१२.१९७९)

इ) कालबध्द पदोन्नती सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढीसंबंधी :- (शासन निर्णय दिनांक २२.११.२०००)

शासकीय कर्मचाऱ्याला पदोन्नती मधील कुंठीतता घालविण्याकरीता कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला तर तो ज्या संवर्गात काम करीत आहे त्या संवर्गात परंतु आगाऊ वेतनवाढीच्या दिनांकास ज्या वेतनश्रेणीत वेतन घेत असेल त्या वरिष्ठ वेतनश्रेणीत आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात.

**६. दक्षता रोध :-**

आगाऊ वेतनवाढ/ वेतनवाढी दिल्यामुळे निश्चित होणारे वेतन जर वेतनश्रेणीतील दक्षता रोधाच्या नंतरच्या टप्प्यावर निश्चित होत असेल तर महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ३७ अन्वये दक्षता रोध पार करून पुढील वेतनवाढ मंजूर करण्यासंबंधीचे आदेश काढण्याची आवश्यकता नाही. (शासन निर्णय दिनांक ६.८.१९९३)

७. सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ मंजूर करणे :-

ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना त्यांनी शासकीय सेवेत असताना केलेल्या अत्युत्कृष्ट कामाबद्दल अनुज्ञेय असलेल्या दिनांकास वेतनवाढ / वेतनवाढी मिळणे अपेक्षित होते, परंतु प्रशासकीय विलंबामुळे ते सेवानिवृत्त होईपर्यंत तत्संबंधीचे आदेश निर्गमित होऊ शकले नाहीत अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वीच्या अनुज्ञेय आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी खाली नमूद केलेल्या अटींच्या अधिनस्त मंजूर करण्यात याव्यात. (शासन निर्णय दिनांक ४.८.१९९४)

अ ) सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास /अधिकाऱ्यास सेवानिवृत्तीपूर्वीच्या अनुज्ञेय दिनांकापासून आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करताना संबंधित संवर्गातील ५ % ही विहित कमालमर्यादा ओलांडली जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.(शासन निर्णय दिनांक ४.८.१९९४)

ब) ज्या शासकीय कर्मचाऱ्याला /अधिकाऱ्याला ज्या दिनांकापासून आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी देण्याचे प्रस्तावित आहे त्या दिनांकापासून ते आगाऊ वेतनवाढीच्या प्रस्तावाची प्रत्यक्ष तपासणी होण्याचा दिनांक या दरम्यानच्या कालावधीत शासकीय कर्मचारी / अधिकारी सेवानिवृत्त झाल्यास त्या शासकीय कर्मचाऱ्याला आगाऊ वेतनवाढीच्या प्रस्तावित दिनांकापासुन आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात (शासन निर्णय दिनांक ४.८.१९९४)

क) सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी/ अधिकारी यांना अनुज्ञेय दिनांकापासून आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूर करताना जास्तीत जास्त ३ वर्षापर्यंत प्रशासकीय विलंब झाला असल्यास अशा प्रकरणांचा विचार करावा. प्रशासकीय विलंब याची व्याख्या विभागीय अथवा मध्यवर्ती समितीच्या सदस्यांच्या कार्यबाहुल्यामुळे सदर समितीची बैठक वेळच्यावेळी न होता उशिरा होणे एवढयापुरतीच मर्यादित आहे. इतर कोणत्याही कारणांमुळे विलंब झाल्यास त्यास प्रशासकीय विलंब म्हणता येणार नाही (शासन निर्णय दिनांक ४.८.१९९४)

ड) शासकीय सेवेत असणाऱ्या शासकीय कर्मचारी/ अधिकारी यांना डावलून सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला/ अधिकाऱ्याला आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी देता येणार नाहीत . (शासन निर्णय दि.४.८.१९९४)

८. विभागीय चौकशी :-

अ) शासकीय कर्मचाऱ्याला/अधिकाऱ्याला ज्या दिनांकापासून आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करावयाच्या आहेत त्या दिनांकापासून आगाऊ वेतनवाढीचे प्रत्यक्ष आदेश निर्गमित करण्याचा दिनांक या दरम्यानच्या कालावधीत या अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या विरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात येत असल्याचे अथवा सुरू करण्याचे प्रस्तावित केले असल्याचे आढळून आले तसेच काही कर्मचारी/अधिकारी यांच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चा भंग होत असल्याने त्यांच्या विरूध्द विभागीय कारवाई करण्यात येत असल्याचे आढळून आले तर आणि अशा प्रकरणी ज्या कर्मचाऱ्याचे / अधिकाऱ्याचे विरूध्द विभागीय कारवाई करण्यात येत असेल अथवा विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित केले असेल त्यांचे प्रकरणी विभागीय चौकशी अथवा कारवाई यासंबंधी अंतिम निर्णय लागेपर्यंत आगाऊ वेतनवाढ मंजूरीचे आदेश निर्गमित करण्यात येऊ नयेत (शासन निर्णय दिनांक १६.८.१९९५).

ब) अशा कर्मचाऱ्यांविरूध्द/अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशीची प्रकरणे अंतिम झाल्यानंतर अशा चौकशी/कारवाईतून सदर कर्मचारी निर्दोष असल्याचे निष्पन्न झाले असल्यास त्यांना ज्या दिनांकास आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या दिनांकापासून ती देण्यात यावी. ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना विभागीय चौकशीच्या अनुषंगाने शिक्षा झाली असेल अशांच्या आगाऊ वेतनवाढीच्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये.

९. **आगाऊ वेतनवाढ / वेतनवाढी मंजूरी प्राधिकाऱ्याने विचारात घ्यावयाच्या बाबी :-**

अ) संबंधित कर्मचाऱ्याला/अधिकाऱ्याला आगाऊ वेतनवाढ/वाढी मंजूर करताना त्याने धारण केलेल्या पदाच्या वेतनश्रेणीतील त्याचे वेतन कोणत्या टप्प्यावर आहे आणि आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्या असता त्याला प्रत्यक्ष आर्थिक फायदा होईल किंवा नाही याची संबंधित विभागांनी प्रस्ताव सादर करतांना खात्री करून घ्यावी.

ब) मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुखांनी गट "अ", गट "ब", गट "क" व गट "ड" मधील संवर्गनिहाय किती कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्या किंवा कोणत्याही अशा वेतनवाढी मंजूर न केल्यास त्यामागील कारणे काय होती याची माहिती ती पुढील वर्षाच्या १ जानेवारीपर्यंत परिशिष्ट "अ" (प्रत सोबत जोडली आहे) मध्ये नमूद केलेल्या विहित विवरणपत्रात संकलित करावी. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या आस्थापना (खुद्द) ची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावी. (शासन निर्णय दिनांक ४.८.१९८१ व दिनांक ७.१.१९८६)

क) सर्व मंत्रालयीन विभाग व विभागप्रमुखांनी आगाऊ वेतनवाढी संबंधीचे प्रस्ताव तपासताना प्रस्ताव परिशिष्ट "ब" (प्रत सोबत जोडली आहे) मध्ये नमूद केलेल्या विवरणपत्राप्रमाणे असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच गट "अ" व "ब" च्या अधिकाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव प्रशासकीय विभागाकडे पाठविताना परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या विवरणपत्रातील माहिती संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालाच्या नस्तीसह पाठवावी. (शासन निर्णय दिनांक १९.२.१९८४)

ड) शासकीय कर्मचाऱ्याला/अधिकाऱ्याला आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करताना ती त्यावर्षीच्या १ ऑक्टोबर पासुन मंजूर करण्यात यावी.

१०. **संवर्ग निहाय कमाल मर्यादा :-**

एकूण संवर्गाच्या ५ % पदांवर आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यात येतात. उप सचिव, अवर सचिव, वरिष्ठ स्वीय सहाय्यक, निवडश्रेणी लघुलेखक आणि कक्ष अधिकारी हे मंत्रालयीन सामायिक संवर्ग असल्याने सामायिक संवर्गातील एकूण संवर्ग संख्येच्या ५% पदांवर आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात. त्यासाठी या पदांची विभागवार संवर्गसंख्या विचारात घेण्यात येऊ नये.

११. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी आगाऊ वेतनवाढीचे प्रस्ताव मंजूर करताना या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व सूचनांचे यथायोग्य पालन काटेकोरपणे होत असल्याची दक्षता घ्यावी आणि अधिकाधिक व्यक्तींना विहित मुदतीतच आगाऊ वेतनवाढीचे लाभ दिले जात आहेत याची खात्री करुन घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रकाश लोखंडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट 'अ'
## विवरणपत्र
## वार्षिक अहवाल

**वर्ष :-**

| मंत्रालयीन विभागाचे नाव | विभाग प्रमुखाचे नावं | अत्युत्कृष्ट कामानिमित्त आगाऊ वेतनवाढी देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | | | | वेतनवाढी न देण्यामागील कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गट 'अ' | गट 'ब' | गट 'क' | गट 'ड' | |

## परिशिष्ट "ब"

### अत्युत्कृष्ट कामानिमित्त आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबत

१. शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव :

२. जन्म तारीख :

३. (अ) सध्या धारण केलेले पद :
(ब) या पदाची वेतनश्रेणी :
(क) सध्याचे मूळ वेतन :
(ड) हे पद नियमितरित्या धारण केल्याची (सेवाप्रवेश नियमानुसार व विहित मार्गाने झालेल्या नियुक्तीची) तारीख :

४. (अ) ज्या पदासाठी आगाऊ वेतनवाढीचा विचार करता येईल ते पद
(ब) त्या पदाची वेतनश्रेणी
(क) त्या पदावरील नियमित (सेवाप्रवेश नियमानुसार व विहित मार्गाने झालेल्या) नियुक्तीचा दिनांक.
(ड) आगाऊ वेतनवाढी ज्या दिनांकापासून मंजूर करण्यात येतील त्या दिनांकास मूळ वेतन : दिनांक १ ऑक्टोबर

५. यापूर्वी आगाऊ वेतनवाढ मंजूर केली असल्यास कोणत्या पदामध्ये व त्याचा दिनांक (होय किंवा नाही हे स्पष्ट करण्यात यावे, असल्यास त्याचा दिनांक देणे आवश्यक आहे.)

६. विभागीय चौकशी चालू असल्यास अथवा चालू करण्याचे प्रस्तावित असल्यास ते नमूद करावे.

कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख /उप सचिव,
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील/ वर्तणूक) नियमात सुधारणा

भाग

३६

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग चार-अ

वर्ष २, अंक ४]   गुरुवार ते बुधवार, एप्रिल १५-२१ २०१०/चैत्र २५-वैशाख १, शके १९३२   [पृष्ठे ११
[ किंमत : रुपये ४.०० ]

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल २०१०

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर. १००८/प्र.क्र. ४५/०८/११.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) (सुधारणा) नियम, २०१० असे म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ मध्ये,—

(एक) " पोट-नियम (२) नंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ याच्या नियम २२अ च्या अर्थांतर्गत लैंगिक छळवादाची तक्रार असेल तर, अशा तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक विभागात किंवा कार्यालयात गठित करण्यात आलेली तक्रार निवारण समिती ; या नियमांच्या प्रयोजनासाठी शिस्तभंगाविषयक प्राधिकाऱ्याने नियुक्त केलेली चौकशी प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल आणि जर लैंगिक छळवादाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी, तक्रार निवारण समितीकरिता स्वतंत्र कार्यपद्धती विहित केली नसेल तर, तक्रार निवारण समिती, या नियमांमध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार, व्यवहार्य असेल तेथवर : स्वत: चौकशी करील.".

(दोन) पोट नियम (७) ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात यावा :—

" (७) चौकशी प्राधिकाऱ्याला दोषारोपाच्या सर्व बाबी व गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनांच्या आरोपांचे विवरणपत्र मिळाल्याच्या तारखेपासून, शासकीय कर्मचारी याने, कार्यलयीन कामकाजाच्या दहा दिवसांच्या आत, याबाबतीत चौकशी प्राधिकाऱ्याने लेखी नोटीशीद्वारे विनिर्दिष्ट केले असेल त्या दिवशी व त्या वेळी किंवा चौकशी प्राधिकारी मुभा देईल अशा आणखी दहा दिवसांहून अधिक नसेल इतक्या पुढील कालावधीत स्वत: चौकशी प्राधिकाऱ्यासमोर हजर झाले पाहिजे.".

(तीन) पोट नियम (८) ऐवजी, पुढील पोट नियम दाखल करण्यात येईल :—

" (८) (अ) शासकीय कर्मचारी आपल्या वतीने प्रकरण सादर करण्यास, त्याच्या मुख्यालयातील किंवा ज्या ठिकाणी चौकशी घेण्यात येईल त्या ठिकाणच्या कोणत्याही कार्यालयातील इतर कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याची मदत घेऊ शकेल. परंतु, या प्रयोजनासाठी, शिस्तभंगाविषयक प्रधिकाऱ्याने नियुक्त केलेला सादरकर्ता अधिकारी हा विधी व्यवसायी असल्याखेरीज किंवा प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन शिस्तभंगाविषयक प्राधिकाऱ्याने तशी संमती दिली असल्याखेरीज अन्यथा विधी व्यवसायीची मदत घेऊ शकणार नाही :

परंतु, प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन, आणि लेखी कारणे नमूद करून, चौकशी प्राधिकाऱ्याने तशी संमती दिली तर, शासकीय कर्मचाऱ्याला, इतर कोणत्याही ठिकाणच्या इतर कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याची मदत घेता येईल.

**टीप**.—शासकीय कर्मचाऱ्याला, ज्याच्याकडे याआधीच हाती घेतलेली तीन शिस्तभंगाची प्रकरणे प्रलंबित असतील, अशा इतर कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याची मदत घेता येणार नाही.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याला, राज्यपालांनी याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट केलेल्या अशा शर्तींना अधीन राहून, त्याच्या वतीने प्रकरण सादर करण्यास सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याची देखील मदत घेता येईल."

३. ही अधीसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००४०११४३७२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**म. चिं. पाटील,**
शासनाचे उप सचिव.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग चार-अ

वर्ष २, अंक १०] गुरुवार ते बुधवार, जुलै १-७ २०१०/आषाढ १०-१६, शके १९३२ [पृष्ठे ११

[ किंमत : रुपये ४.०० ]

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जून २०१०

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर. १००९/प्र.क्र. ५६/०९/११.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) (दुसरी सुधारणा) नियम, २०१० असे म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ (यापुढे " मूळ नियम " असा निर्देश करण्यात आला आहे) च्या नियम ९ मधील,—

(अ) पोट-नियम (२) ऐवजी पुढील पोट-नियमाचा समावेश करण्यात यावा :—

" (२) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने कोणतीही चौकशी केली असल्यास, त्या चौकशी अहवालाची प्रत किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकारण हे स्वत: चौकशी प्राधिकरण नसेल त्याबाबतीत, चौकशी प्राधिकरणाने काढलेल्या निष्कर्षास असहमत असल्यास असहमतीच्या तात्पुरत्या निष्कर्षासह त्या चौकशी अहवालाची प्रत, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला पाठविण्यात येईल. चौकशी अहवाल संबंधित शासकीय कर्मचारी यांस अनुकूल असो वा प्रतिकूल असो, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याची तशी इच्छा असल्यास कमाल १५ दिवसांच्या आत तो त्यासंदर्भातील निवेदन शिस्तभंगविषयक प्राधिकणास सादर करील." ;

(ब) पोट-नियम (२) नंतर पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२-ए) जर शासकीय कर्मचाऱ्याने काही निवेदन सादर केले असेल तर त्याचा शिस्तभंगविषयक प्राधिकरण विचार करील आणि या नियमाच्या पोट-नियम (३) आणि (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यापूर्वी त्यासंदर्भातील निष्कर्ष अभिलिखीत करील.".

(क) पोट-नियम (४) मध्ये- " नियम ५, पोट-नियम (१) च्या खंड (*पाच*) ते (*नऊ*)" या मजकुराऐवजी "नियम ५, पोट-नियम (१) च्या खंड (*सात*) ते (*नऊ*) हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

३. मुख्य नियमाच्या नियम ११ ऐवजी पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" ११. **कर्मचाऱ्यास आदेश कळविणे**—शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याचे आदेश दोषारोपाच्या प्रत्येक बाबीसंबंधातील निष्कर्षाच्या प्रतिसह, शासकीय कर्मचाऱ्याला कळविण्यात येतील किंवा जेथे शिस्तभंगविषयक प्राधिकरण चौकशी प्राधिकरण नसेल आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरण चौकशी प्राधिकरणाच्या निष्कर्षाशी सहमत नसेल तेथे असहमतीची थोडक्यात कारणं आणि चौकशी प्राधिकरणाने काढलेल्या निष्कर्षासह शिस्तभंगविषयक प्राधिकरणाच्या निष्कर्षाचे विवरणपत्र तसेच, आयोगाचा सल्ला घेतला असल्यास त्याची एक प्रत आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने जेथे आयोगाचा सल्ला स्वीकारलेला नसेल तेथे त्याबाबतच्या कारणांचे थोडक्यात विवरण या गोष्टीही त्याला देण्यात येतील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**म. चिं. पाटील,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th June 2010

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. CDR.1009/C.R.56/09/11.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) (2nd Amendment) Rules, 2010.

2. In rule 9 of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979 (hereinafter referred to as "the principal rules"),—

(*a*) for sub-rule (2), the following sub-rule shall be sunstituted, namely :—

"(*2*) The disciplinary authority shall forward or cause to be forwarded a copy of the report of the inquiry, if any, held by the disciplinary authority or where the disciplinary authority is not the inquiring authority, a copy of the report of the inquiring authority together with its own tentative reasons for disagreement, if any, with the findings of inquiring authority on any article of charge to the Government servant who shall be required to submit, if he so desires, his written representation or submission to the disciplinary authority within fifteen days, irrespective of whether the report is favourable or not the said Government servant." ;

(*b*) after sub-rule (2), the following sub-rule shall be inserted, namely :—

"(*2A*) The disciplinary authority shall consider the representation, if any, submitted by the Government servant and record its findings before proceeding further in the matter as specified in sub-rules (*3*) and (*4*).".

(*c*) in sub-rule (*4*), for the words and figures "clauses (*v*) to (*ix*) of sub-rule (*1*) of rule 5" the words and figures "clauses (*vii*) to (*ix*) of sub-rule (*1*) of rule 5" shall be substituted.

3. For rule 11 of the principal rules, the following rule shall be substituted, namely :—

" 11. *Communication of orders.*—Orders made by the disciplinary authority shall be communicated to the Government servant, who shall also be supplied with a copy of its finding on each article of charge, or where the disciplinary authority is not the inquiring authority, a statement of the findings of the disciplinary authority together with brief reasons for its disagreement, if any, with the findings of the inquiring authority and also a copy of the advice, if any, given by Commission, and, where the disciplinary authority, has not accepted the advice of the Commission, a brief statement of the reasons for such non-acceptance.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. C. PATIL,
Deputy Secretary to Government.

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ, गुरुवार ते बुधवार,
ऑक्टोबर २१-२७, २०१०/आश्विन २९-कार्तिक ५, शके १९३२

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर २०१०.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर.१०१०/प्र.क्र. २०/१०/११ :— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील प्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) (तिसरी सुधारणा) नियम, २०१० असे म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ५ मध्ये, पोट-नियम (१) मधील खंड (सहा) ऐवजी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" *(सहा)* शासकीय कर्मचा-यास शिक्षेच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधिसाठी तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये असेल त्यापेक्षा खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये आणणे. ज्या वेतन समयश्रेणीतून, पदावरून, श्रेणीमधून किंवा सेवेतून शासकीय कर्मचा-यास असे अवनत करण्यात आले असेल, त्या वेतन समयश्रेणीमधील, पदावरील, श्रेणीमधील किंवा सेवेतील बढतीस अशी अवनती अशा विनिर्दिष्ट कालावधिसाठी रोधक ठरेल, अशा आदेशांमध्ये तो कालावधी समाप्त झाल्यावर शासकीय कर्मचा-यास पूर्वीच्या वेतन समयश्रेणीत, पदावर, श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये परत आणण्यासंबंधीच्या पुढील अटींचा समावेश असावा :—

(अ) पदावनतीच्या विनिर्दिष्ट कालावधिच्या परिणामी भावी काळातील वेतनवाढी पुढे ढकलल्या जातील किंवा कसे, व त्या कोणत्या मर्यादेपर्यंत, आणि,

(ब) शासकीय कर्मचा-यास त्याच्या वेतन समय श्रेणीमध्ये, पदावर, श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये मूळ सेवाज्येष्ठता मिळेल किंवा कसे. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जे. पी. डांगे,**
शासनाचे मुख्य सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 1st September 2010

### *NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. CDR. 1010/C.R. 20/10/11.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India, the Governor of Maharashtra is Herby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Descipline and Appeal) (3rd Amendment) Rules, 2010.

2. In Rule 5 of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) rules, 1979, in sub-rule *(1)*, for clause (vi), the following clause shall be substituted, namely :—

" *(vi)* reduction to lower time-scale of pay, grade, post or service for a period to be specified in the order of penalty, which shall be a bar to the promotion of the Government servant during such specified period to the time-scale of pay, grade, post or Service from which he was reduced, with direction as to whether or not, on promotion on the expiry of the said specified period,—

(*a*) the period of reduction to time-scale of pay, grade, post or service shall operate to future increments of his pay, and if so, to what extent; and,

(*b*) the Government Servant shall regain his original seniority in the higher time-scale of pay, grade, post or service. "

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. P. DANGE,
Chief Secretary to Government.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग चार-अ

वर्ष ३, अंक १७] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २७-नोव्हेंबर २, २०११/कार्तिक ५-११, शके १९३३ [पृष्ठे ३
[ किंमत : रुपये ४.०० ]

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑक्टोबर २०११

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर. १०११/प्र.क्र. १०९/११.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, २०११ असे म्हणण्यात यावे.

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ, गुरुवार ते बुधवार,
ऑक्टोबर २७-नोव्हेंबर २, २०११/कार्तिक ५-११, शके १९३३

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ मधील पोट-नियम ५ मध्ये खंड (क) नंतर, पुढीलप्रमाणे परंतुक समाविष्ट करण्यांत येईल :—

"परंतु, जेथे शासकीय कर्मचा-यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असेल तेथे, या नियमान्वये देण्यात आलेल्या किंवा देण्यात आला असल्याचे मानलेल्या निलंबनाच्या आदेशात फेरबदल करण्यापुर्वी वा तो रद्द करण्यापुर्वी, असा आदेश ज्या प्राधिकरणाने दिला असेल किंवा ज्या प्राधिकरणाकडून देण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल ते प्राधिकरण किंवा असे प्राधिकरण ज्याच्या नियंत्रणाखाली असेल असे प्राधिकरण, शासनाने या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीची शिफारस प्राप्त करून घेईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पां. जो. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th October 2011

### *NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. CDR.1011/C.R.109/11.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 2011.

2. In rule 4 of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, in sub-rule (5), after clause (*c*), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, where a criminal offence is registered against a Government servant, the recommendation of the Suspension Review Committee constituted by the Government in this behalf, shall be obtained by the authority which has made or is deemed to have made the suspension order or by any authority to which that authority is subordinate, before revoking or modifying the order of suspension of such Government servant.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. J. JADHAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक २०] गुरुवार, मे ९, २०१३/वैशाख १९, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये २५.००

**असाधारण क्रमांक ५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ मे २०१३

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर-१०११/प्र.क्र. १४४/पुनर्बांधणी ७/११.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (सुधारणा) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १९ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१), टीप– २ मध्ये, " रु. (१०,०००) हून कमी " या शब्द, अक्षर व अंकाच्या ऐवजी " शासकीय कर्मचाऱ्याच्या दोन महिन्यांच्या मूळ वेतनाहून कमी " या शब्दांचा समावेश करण्यात यावा ;

(ब) पोट-नियम (३) च्या जागी पुढील पोट-नियम दाखल करण्यात यावा :—

" (३) प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याने स्वतःच्या नावाने किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियांच्या नावाने केलेला ज्याची किंमत त्याच्या दोन महिन्यांच्या मूळ वेतनापेक्षा अधिक असेल असा जंगम मालमत्तेचा प्रत्येक व्यवहार विहित प्राधिकरणास कळवील.

परंतु, जर असा कोणताही व्यवहार—

(एक) शासकीय कर्मचाऱ्याशी कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या व्यक्तीबरोबर, किंवा

(दोन) नेहमीच्या किंवा प्रसिद्ध व्यापाऱ्यामार्फत केला असेल त्याहून अन्य प्रकारे केला असेल तर शासकीय कर्मचाऱ्याला विहित प्राधिकरणाची पूर्वमंजूरी मिळवावी लागेल. "

(क) पोट-नियम (५) खालील स्पष्टीकरणामधील खंड (१) खालील उप खंड (अ) मध्ये, " ज्यांचा वार्षिक हप्ता रु. "(१०,०००) हून अधिक आहे अशा विमापत्रांची रक्कम किंवा शासनाकडून मिळालेल्या एकुण वार्षिक विमालब्धीच्या एक-षष्ठांश रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम " या शब्द, अक्षरे आणि अंकाऐवजी " ज्यांचा वार्षिक हप्ता शासकीय कर्मचाऱ्याच्या दोन महिन्यांच्या मूळ वेतनापेक्षा अधिक आहे अशी विमापत्रे " हे शब्द दाखल करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पां. जो. जाधव,
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 7th May 2013

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. CDR-1011/C.R.144/Reconstruction 7/11. – In exercise of the Powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Conduct) (Amendment) Rules, 2013.

2. In rule 19 of the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979,—

(a) in sub-rule (1), in Note II, for the words, letters and figures "less than Rs.10,000" the words "less than two months basic pay of the Government Servant" shall be substituted ;

(b) for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(3) Every Government servant shall report to the prescribed authority every transaction entered into by him either in his own name or in the name of a member of his family in respect of movable property if the value of such property exceeds two months basic pay of the Government servant :

Provided that, the previous sanction of the prescribed authority shall be obtained if any such transaction is,—

(i) with a person having official dealings with the Government servant; or

(ii) otherwise than through a regular or reputed dealer."

(c) in sub-rule (5), in *Explanation*, in clause (1), in sub-clause (a),for the words, letters and figures "insurance policy the annual premia of which exceed Rs. 10,000 or one sixth of the total annual emoluments received from Government whichever is less" the words "insurance policy the annual premia of which exceed two months basic pay of the Government servant" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. J. JADHAV,
Deputy Secretary to Government.

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक १०८] गुरुवार, मार्च ६, २०१४/फाल्गुन १५, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ४५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ फेब्रुवारी २०१४

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक वशिअ. १११३/प्र.क्र. ७३/११.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (सुधारणा) नियम, २०१४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१) च्या शेवटी पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात यावे :—

"स्पष्टीकरण.—शासकीय कर्मचारी वारंवार त्याला नेमून दिलेले काम त्यासाठी विहित केलेल्या कालमर्यादेत आणि त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या दर्जानुरूप पूर्ण करीत नसेल तर ती वरील पोट-नियम (१) मधील खंड (दोन) च्या अर्थांतर्गत कर्तव्यपरायणतेमधील उणीव मानली जाईल."

(ब) पोट-नियम (३) च्या जागी खालील पोट-नियम समाविष्ट करण्यात यावा :—

"(३) (एक) कोणताही शासकीय कर्मचारी त्याच्या कार्यालयीन वरिष्ठाच्या निदेशानुसार कृती करीत असेल ते खेरीजकरून, त्याच्या कार्यालयीन कर्तव्याचे पालन करीत असताना किंवा त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना त्याच्या सत्सद्‌विवेकबुद्धीनुसार सत्य व अचूक नसलेल्या गोष्टी करणार नाही,

(दोन) कार्यालयीन वरिष्ठाचे निदेश सामान्यत: लिखित स्वरूपात असतील. मौखिक निदेश देण्याचे, शक्य असेल तेथवर, टाळले जाईल. मौखिक निदेश देणे अपरिहार्य असेल तेव्हा कार्यालयीन वरिष्ठ त्यास त्यानंतर तात्काळ लिखित पुष्टी देईल,

(तीन) शासकीय कर्मचारी, त्याला त्याच्या कार्यालयीन वरिष्ठांकडून मौखिक निदेश मिळाल्यानंतर शक्य तेवढ्या लवकर त्यास लेखी पुष्टी मिळविल आणि अशा प्रकरणी निदेशाची लेखी पुष्टी देणे हे कार्यालयीन वरिष्ठाचे कर्तव्य असेल.".

सदर शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून अधिसूचनेचा संकेतांक २०१४०२२४१४४२५३४१०७ असा आहे. ही अधिसूचना डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पां. जो. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 24th February 2014.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. VASHIA. 1113/C.R. 73/11.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the Following rules further to amend the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the maharashtra Civil Services (Conduct) (amendment) Rules, 2014.

2. In rule 3 of the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979,—

(*a*) in sub-rule (1), at the end, the following explanation shall be added, namely :—

"*Explanation.*—A Government servant who habitually fails to perform the task assigned to him within the time set for the purpose and with the quality of performance expected of him shall be deemed to be lacking in devotion to duty within the meaning of clause (*ii*) of sub-rule (1)."

(*b*) for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(3) (*i*) No Government servant shall, in the performance of his official duties, or in the exercise of powers conferred on him, act otherwise than in his own best judgement to be true and correct except when he is acting under the direction of his official superior ;

(*ii*) The direction of the official superior shall ordinarily be in writing. Oral direction to subordinates shall be avoided, as far as possible. Where the issue of oral direction becomes unavoidable, the official superior shall confirm it in writing immediately thereafter ;

(*iii*) A Government servant who has received oral direction from his official superior shall seek confirmation of the same in writing, as early as possible and in such case, it shall be the duty of the official superior to confirm the direction in writing."

This notification of Maharashtra Government is available at the website *www.maharashtra.gov.in.* Notification No. for this is 201402241442534107. This notification has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. J. JADHAV,
Deputy Secretary to Government.